| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २७० वा | शनिवार दिनांक १० जानेवारी, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## श्री तुळजाभवानी मंदिर विकास आराखड्यास पालकमंत्री प्रताप सरनाईक यांचा गतीदायक पाठपुरावा: ५५५.८० कोटीं रुपयांच्या कामांना तांत्रिक मान्यता

धाराशिव (जिमाका) श्री क्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी तयार करण्यात आलेल्या भव्य विकास आराखड्याला शासनस्तरावर वेग मिळाला असून,पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या प्रकल्पातील कामांना तांत्रिक आणि प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

या विकास आराखड्याच्या पाठपुराव्यासाठी पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी आज मुंबई येथून दूरदृश्यप्रणालीद्वारे संबंधित सर्व यंत्रणांची आढावा बैठक घेतली.

या बैठकीला आमदार राणाजगजितसिंह पाटील, जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार, मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष व अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांची ऑनलाईन तर सभागृहात अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील,निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कळवकर,जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे,उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख,मंदिर संस्थानच्या व्यवस्थापक माया माने, नगर परिषद तुळजापूर मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे,सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत साळी, अधिक्षक अभियंता महावितरण संजय आडे,छत्रपती संभाजीनगरचे राज्य पुरातत्व विभागाचे वैभव वानखेडे,तुळजापूर पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अभियंता प्रज्वलित मंगरुळे,तुळजापूर सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता व्ही.वाय.आवाळे यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

श्री क्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिर विकास आराखड्यास १८६५ कोटी रुपयांच्या निधीस शासनाकडून मान्यता मिळाली आहे.शासनाने मंजूर केलेल्या या विकास आराखड्यात एकूण ५५५.८० कोटीं रुपयांच्या चार प्रमुख कामांचा समावेश असून त्यांचे अंदाजपत्रक तयार करून त्यास तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे. या अंतर्गत घाटशीळ पार्किंग येथे भाविक सुविधा केंद्र व बहुउद्देशीय वाहनतळ उभारणीसाठी ७७.०२ कोटी रुपये,हडको पार्किंग परिसरात सुविधा केंद्र,व्यावसायिक संकुल, बहुउद्देशीय सभागृह व वाहनतळासाठी ३७६.३३ कोटी रुपये,आराधवाडी पार्किंग येथे सुविधा केंद्रासाठी ४५.४३ कोटी रुपये तसेच जुने एस.टी.स्टँड परिसरात भाविक सुविधा केंद्रासाठी ५७.२३ कोटीं रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.



याशिवाय या विकास आराखड्यातील ४५७.८० कोटी रुपयांच्या कामांची अंदाजपत्रके तयार करून त्यांना तांत्रिक मान्यता देण्यात आली असून निविदा प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे. तसेच सन २०२५-२६ साठी ५४.२८ कोटी रुपयांची तरतूद आणि सन २०२६-२७ साठी ५०० कोटी रुपयांच्या अंदाजित तरतुदीचे नियोजन करण्यात आले आहे.भूमी संपादनासाठी यापूर्वीच २८.८८ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, उपविभागीय अधिकारी,धाराशिव यांच्यामार्फत संपादन प्रक्रिया सुरू आहे. तसेच सल्लागार शुल्कापोटी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणीही शासनाकडे करण्यात आली आहे.

पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी श्री तुळजाभवानी मंदिर परिसराचा केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यटनदृष्ट्याही विकास व्हावा या हेतूने हा प्रकल्प मार्गी लावला आहे.भाविकांना सुरक्षित,सोयीस्कर आणि सुव्यवस्थित सुविधा मिळाव्यात यासाठी हा आराखडा आदर्श ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

विकास आराखड्यातील मंजूर कामे अनुभवी कंत्राटदारांकडून वेळेत करुन घ्यावेत,या कामास गती द्यावी, कंत्राटदारांकडून योग्य अंदाजपत्रक मिळाले नसल्यास निधी मंजूरीस अडचण निर्माण होते,त्यामुळे योग्य अंदाजपत्रक मागवून घ्यावे,विकास आराखड्यातील सर्व कामे जानेवारी २०२८ पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचनाही पालकमंत्री श्री.सरनाईक यांनी यावेळी दिल्या.

प्रिबीडमधील सूचनांचा स्विकार करण्याचे पूर्ण अधिकार श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी श्री. पूजार यांना असतील असे पालकमंत्री श्री.सरनाईक यांनी यावेळी सांगितले.श्री तुळजाभवानी मंदिराच्या अवतीभवतीच्या महसूली जमीनी मंदिर संस्थानला वर्ग करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करावा.मंदिर परिसरामध्ये पोलीस चौकी बांधण्यासाठी स्वतंत्र तरतूद करण्यात येईल असे पालकमंत्री प्रताप सरनाईक यावेळी म्हणाले.

आमदार राणाजगजितसिंह यांनी श्री तुळजाभवानी मंदिर विकास आराखड्याशी सर्व संबंधित यंत्रणांनी एकत्रित पाहणी करुन वेगवेगळे अहवाल तयार करून स्वतंत्र प्रस्ताव मंदिर संस्थानचे अध्यक्ष जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्याच्या सूचना

या प्रकल्पामुळे भाविकांच्या सुविधांमध्ये आमूलाग्र सुधारणा होणार असून तुळजापूर शहराच्या पर्यटन,रोजगार व आर्थिक विकासालाही मोठी चालना मिळणार आहे.

## क्राईम न्युज

### अंगावारील दागिणे सह रोख रक्कम चोरली

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे कविता ज्ञानदेव कसबे, वय ५५वर्षे, रा. रुईढोकीता. जि. धाराशिव ह.मु. सुभाष देशमुख यांचे शेतात उपळा शिवार ता. जि. धाराशिव यांचे राहते घराचा अनोळखी तीन इसमांनी दि. ०७.०१.२०२६ रोजी दरवाजा वाजवल्याने कविता कसबे यांचे पतीने दरवाजा उघडताच अनोळखी तीन इसमांनी घरात जबरदस्तीने प्रवेश करुन फिर्यादीस व तिचे पतीस लाथाबुक्यांनी, कुह्राडीचा दांडा, स्क्रु ड्रायव्हर मारहाण करुन कविता कसबे यांचे अंगावरील ४ ग्रॅमचे दागिने व रोख रक्कम ११,५०० किंमतीचा माल जबरदस्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-कविता कसबे यांनी दि.०८.०१.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०९(६),३३२(बी), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### गोडावूनच्या शटरचे कुलूप तोडून सोयाबिन व इतर वस्तूची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सचिन गोपाळ साखरकर, वय ३२ वर्षे, रा. उजनी ता. औसा जि. लातुर यांचे काक्रंबा येथील डेक्कन फार्मस ग्रो समृध्दी प्रा.लि. कंपनीचे खरेदी विक्री केंद्राचे गोडावूनच्या शटरचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.०८.०१.२०२६ रोजी. तोडून आत प्रवेश करुन गोडवून मधील ४० कट्टे सोयाबीन व डिव्हीआर असा एकुण १,६६,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सचिन साखरकर यांनी दि.०८.०१.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३४(१),३०५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### ॲल्युमिनीयम व तांब्याचे केबलची चोरी

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि. ०१.०१.२०२६ रोजी .रिन्यु कंपनीचे आरएसएल -७ पवनचक्कीचे ठिकाणी चिकुंद्रा येथे ता. तुळजापूर येथील पवनचक्कीच्या आतील ॲल्युमिनीयम व तांब्याचे केबल असा एकुण १,००,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे -गजानन व्यंकट हाळदे, वय २७ वर्षे, रा.नळदुर्ग ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.०८.०१.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२),३२४(६) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### ‘तडजोड शुल्क’वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.०८ जानेवारी रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २५६ कारवाया करुन २,१०,२०० ‘तडजोड शुल्क’वसुल केले आहे.

## मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना अधिकारी-कर्मचाऱ्यांची कार्यशाळा उत्साहात संपन्न



धाराशिव दि.९ जानेवारी (जिमाका) शेतकऱ्यांना शेतामध्ये पेरणी,आंतर मशागती,कापणी,मळणीच्या कामासाठी तसेच शेतातील उत्पादीत माल घरापर्यंत, बाजारपेठेत पोहचविण्यासाठी बारमाही शेतरस्ते असणे अत्यंत आवश्यक असून यांत्रिकीकरणामुळे शेतीतील कामासाठी यंत्रसामग्रीचा वाढत असल्यामुळे शेत/पाणंद रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.या योजनेची माहिती व कार्यपद्धती संबंधित अधिकारी - कर्मचारी यांना व्हावी यासाठी ८ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे रोजगार हमी योजना विभागाकडून एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेला उपजिल्हाधिकारी (रोहयो) प्रवीण धरमकर,जिल्हा अधीक्षक भूमिअभिलेख श्री.जोगदंड,जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. वारंजे,कळंब उपविभागीय अधिकारी श्री.शिंदे व सामाजिक वनीकरण विभागाचे उपसंचालक विश्वास करे यांची प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थिती होती.

श्री.धरमकर यांनी या योजनेसाठी ग्रामपंचायत,पंचायत समिती,जिल्हा परिषद,बांधकाम विभाग,प्रधानमंत्री/मुख्यमंत्री ग्रामसडक योजना व वन विभाग ह्या कार्यान्विन यंत्रणा असल्याचे सांगितले.तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार,निविदा पद्धती,देयके अदा करण्याचे अधिकार,निधीची उपलब्धता यामध्ये अर्थसंकल्प तरतूद, सामाजिक दायित्व निधी,विविध योजनाच्या अभिसरणातून प्राप्त होणारा निधी याबाबतची माहिती त्यांनी दिली.

तसेच गावनकाशावर दर्शविण्यात आलेले व शासकीय जागेत असलेल्या रस्त्यांवर अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीस तहसीलदार यांनी अतिक्रमण ७ दिवसात काढण्याची नोटीस द्यावी.अतिक्रमण काढले नाही तर सदर अतिक्रमण शासनाकडून तहसीलदार यांनी काढावे.या रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी पाणंद रस्त्यांच्या परिसरातील शासकीय तलावातील गाळ,माती व मुरूम,नदी नाले खोलीकरण करून उपलब्ध होणारा गाळ,माती, मुरूम तसेच परिघातील खाणीतील मुरूम,दगड वापरण्यात यावा याबाबतची माहिती त्यांनी दिली.

या योजनेत ग्रामपंचायतची जबाबदारी,महसूल यंत्रणेची जबाबदारी,पोलीस यंत्रणेची, जिल्हास्तरीय कार्यकारी समितीची कार्यकक्षा, विधानसभा क्षेत्रस्तरीय समिती याबाबतची तसेच योजनेची तांत्रिक कार्यपद्धती याबाबतची माहिती श्री.धरमकर यांनी दिली दिली.

श्री.जोगदंड यांनी गावनकाशावर उपलब्ध असलेले रस्त्यांचे प्रकार यामध्ये ग्रामीण रस्ते, हद्द रस्ते,गाडीचे रस्ते व पाय रस्ते, डबल डॉटेड, सिंगल डॉटेड व पुनर्विलोकन गाव नकाशा याबाबत माहिती दिली.

रोजगार हमी योजना कार्यालयातील एम.आय.एस.श्री.मिश्री जमादार यांनी विकसित भारत -रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) अर्थात व्हि.बी - जी राम जी अधिनियम -२०२५ बाबत माहिती दिली.

कार्यशाळेला सर्व तहसीलदार,गट विकास अधिकारी,वन परिक्षेत्र अधिकारी,मंडळ अधिकारी,ग्राम महसूल अधिकारी व ग्राम विकास अधिकारी यांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांचे निराकरण करण्यात आले.

## दिव्यांग पुनर्वसन केंद्रासाठी स्वयंसेवी संस्थेने १३ जानेवारी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

धाराशिव (जिमाका)-जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींचे पुनर्वसन करण्यासाठी तसेच त्यांना विविध प्रकारच्या थेरपी देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र कार्यान्वित करण्यात येणार आहे.या केंद्राच्या संचालनासाठी जिल्हा व्यवस्थापक समिती गठित करण्यात आली असून,समितीकडून दिव्यांग क्षेत्रात कार्य करणारी व आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्याकडून अनुज्ञप्ती प्राप्त स्वयंसेवी संस्था निवडण्यात येणार आहे.त्यासाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

या संदर्भात पुढील निकष निश्चित करण्यात आले आहेत.संस्थेस २० वर्षांपेक्षा अधिक सामाजिक क्षेत्रातील अनुभव असावा,त्यापैकी किमान १५ वर्षांपेक्षा अधिक दिव्यांग क्षेत्रातील अनुभव असावा.संस्थेस दिव्यांग क्षेत्रात कार्य केल्याबद्दल केंद्र शासन किंवा राज्य शासनाचे पुरस्कार प्राप्त असल्यास प्राधान्य देण्यात येईल. संस्थेस DDRC उपक्रम चालविण्याचा उत्तम अनुभव असावा. ADIP योजनेअंतर्गत जास्तीत जास्त दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ दिलेला असावा.निरामय आरोग्य योजनेचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थ्यांना दिलेला असावा.राज्यस्तरावर कार्य केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.संस्था राष्ट्रीय न्यासकडे नोंदणीकृत असावी.

संस्थेस जिल्हास्तरीय दिव्यांग समितीचे सदस्यत्व किंवा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल. संस्थेची स्वतःची जागा जिल्ह्यात असावी.संस्थेस स्वतःचा दवाखाना चालविण्याचा अनुभव असावा.

संस्थेने दिव्यांग प्रतिबंधक शस्त्रक्रिया केल्याचा अनुभव असावा.संस्थेकडे दिव्यांग व्यक्तींच्या कौशल्य विकासाचा अनुभव असावा. संस्थेमध्ये पदाधिकारी नातेसंबंधातील नसावेत.मागील तीन वर्षांचे लेखापरीक्षण झालेले असावे.मागील तीन वर्षांचे DDRC चालविण्याचे ऑडिट रिपोर्ट प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.

वरील सर्व अटींची पूर्तता करणाऱ्या संस्थांनी आपला परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभाग, जिल्हा परिषद,धाराशिव या कार्यालयाकडे दिनांक १३ जानेवारी २०२६ पर्यंत सादर करावा,असे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जिल्हा परिषद,धाराशिव यांनी केले आहे

## नारायणी महिला जिल्हा सहकारी पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन




धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- अल्पावधीतच विश्वासार्हता आणि कार्यक्षमतेच्या जोरावर नावारूपास आलेल्या नारायणी महिला जिल्हा सहकारी पतसंस्था मर्या., धाराशिव यांच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन गुरुवारी (दि. ८) सायंकाळी ६ वाजता संस्थेच्या मुख्य कार्यालयात, काळा मारुती चौक, मारवाडी गल्ली, धाराशिव येथे पार पडले. हा कार्यक्रम नामांकित मॉडेला टेलर्सचे मालक, संस्थेचे मार्गदर्शक तथा शांत संयमी व्यक्तिमत्त्व सय्यद सरशाद अब्दुल हलिम रझवी यांच्या शुभहस्ते छोटेखानी स्वरूपात पार पडला.

यावेळी संस्थेचे संस्थापक अरुण पवार, जयपाल शेरखाने, संस्थेच्या उपाध्यक्ष कु. मोनाली जयपाल शेरखाने, धाराशिव शाखा व्यवस्थापक शिवप्रसाद काजळे, तुळजापूर शाखा व्यवस्थापक गजानन वैद्य, तसेच संस्थेचे कर्मचारी अमृता सोनटक्के, आकाश पवार, बापू पवार उपस्थित होते. याशिवाय दोन्ही शाखांचे फर्निचर काम करणारे उत्तर प्रदेशातील कारागीर फक्रुद्दीन अन्सारी यांचीही उपस्थिती होती.

## शस्त्र कायद्यांतर्गत गुन्हा नोंद

धाराशिव (प्रतिनिधी)- शिराढोण पोलीस ठाणे अंतर्गत पोलिससाकडून समजलेली माहिती अशी की, विजय अप्पा पवार, वय ३५ वर्षे, रा.वरुडा ता. जि. धाराशिव, छगन श्रीपती काळे, रा. मोहा ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.०८.०१.२०२६ रोजी सु.खामसवाडी ते मोहा जाणारे रोडवर सिध्दीविनायक कारखान्यालगत मनोहर गुंड यांचे शेताजवळे मा. जिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी धाराशिव यांचे शस्त्र बंदी आदेशाचे उल्लघन करुन लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे एक कत्ती सह टीव्हीएस स्टार सिटी मोटरसायकल क्र एमएच२५ एवाय ४५०९ ही विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेला शिराढोण पोलीसांना मिळून आला. यावर पथकाने नमुद कत्ती जप्त करुन फिर्यादी नामे-सुनिल कल्याण कोळेकर, नेमणुक पोलीस ठाणे शिराढोण यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शस्त्र कायदा कलम- ४,२५ सह कलम १२२ (अ) सह भा.न्या.सं.कलम १३५ मपोका अन्वये शिराढोण पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## जनतेचा सहभाग कमी होतोय

निवडणुका ह्या लोकशिक्षणाचे काम करतात. निवडणुकीत मतदार जनता आपली समस्या उमेदवारासमोर मांडतात. खुली चर्चा हात असते. आपल्या समस्या मांडण्यासाठी मिळालेली संधी असते. जसे कुस्तीत एकाचा विजय असतो, तसे निवडणुकीत अनेक उमेदवार उभा राहीले असले तरी एकाला मतदार नागरिकांनी निवडावे लागते. निवडताना मतदार हा विचारपुर्वक निवडतात. पुर्वी सारखे नाही. पुर्वी पक्षाकडे पाहुन एकाच पक्षाला कायमस्वरूपी निवडले जात होते. या मागील कारण तसे होती. पक्ष हा काम करणारा होता. जनतेकडे आपुलकीने पाहाणारी यात मंडळी होती. जनतेचा विश्वास पक्षावर होता. पक्षांबरोबर जनतेचे अतुट नाते होते. कालांतराने राजकारणात समाजकारण कमी व अर्थकारण अधिक शिरले गेले. निवडूण येण्यासाठी काय करावे लागले त्या बाबीचा आवलंब होताना दिसून येत आहे, त्यामुळे मतदार व उमेदवार यातील दुरावा वाढत आहे. निवडणुका ह्या लोकशिक्षणाचे कामे करीत असतात असे असले तरी नागरीकांच्या समस्या ह्या सर्वत्र एकच दिसून येत आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे पिण्याचा पाण्याचा प्रश्न हा सर्वत्र दिसून येत आहे. वास्तविक सत्तर वर्षात राज्यात पिण्याचा प्रश्न कोणत्याही पक्षाने सोडविला नाही हे उघड आहे. राज्यात कॉंग्रेसची सत्ता होती नंतर भाजपा व मित्र पक्षाची सत्ता आहे. तरी मोठ्या शहरातील पिण्याचा प्रश्न सोडविला नाही. सत्तेचे विकेंद्रीकरण यासाठी असते की, विकास झाला पाहिजे. विकास हा सर्वोपरी झाला पाहिजे. ग्रामस्तरापासून ते महानगरपालिकेपर्यंत विकासाची फळे चाखता आली पाहिजेत. ग्रामीणस्तरावर ग्रामपंचायतद्वारे विकास साधला जातो. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून विकास ग्रामीण भागाचा केला जातो. प्रश्न जे शहरातील आहेत, तेच ग्रामीण भागातील आहेत. वेगळी समस्या नाही. पिण्याचे पाणी, रस्ते, वीज व स्वच्छता ही मुलभूत सुविधा देणे स्थानिक स्वराज्य संस्थेचे कर्तव्य आहे ते पार पाडले जाते. मुळात मुलभूत गरजा ह्या नवीन वाढीव वस्तीत निर्माण होतात असे नाही तर कायम स्वरूपी दिसून येत आहेत. त्यामुळे ग्रामीण असो किंवा शहरी भागात कायमस्वरूपी समस्या सोडविण्याचा हा शासनाचा प्रयत्न असला पाहिजे. कायम स्वरूपी सोडवला तर समस्याच उरणार नाहीत. दर पाच वर्षाला तीच समस्या दिसून येते. पिण्याच्या पाण्याची ओरड कायम आहे. यासाठी सर्वात महत्वाचे हे नियोजन आहे. नियोजनाअभावी राज्यात पिण्याचा पाण्याची कायम समस्या दिसून येत आहे. ती प्राधान्याने सोडविली पाहिजे. सरकार मोठ्या प्रमाणात निधीची उपलब्धता करते. त्या निधीचा योग्य उपयोग करणे आवश्यक असते. मुळात सध्याला त्याच त्या समस्या दर पाच वर्षांनी दिसून येत असेल तर पाच वर्षात काय केले हा प्रश्न निर्माण होतो. अजूनही शहरातील पक्के रस्त्याची निर्मिती नाही. गटारीची समस्या कायम आहे. मुळात गटारी काढताना पाण्याचा निचरा कसा होईल याचे नियोजन नसते. त्यामुळे पावसाळ्यात गटारीने पाणी जाण्याएवजी ते घरात शिरते. ही समस्या पावसाळ्यात हमखास जाणवते. त्यामुळे गटारी ह्या शेवटच्या टोका पर्यंत काढल्या जात नाहीत. मध्येच अर्धवट कामे होताना दिसून येतात. महानगरपालिकच्या निवडणुका ह्या प्रभाग निहाय होतात. मुळात बिनविरोध निवड ही प्रभाग होणे अपेक्षित आहे. एक तर चारचार उमेदवार एका प्रभाग उभी आहेत. निवडणुकीनंतर कोणाकडून कामे करून घ्यावीत हा देखिल मुद्दा समोर येतो. महानगरपालिका निवडणुका ह्या विधानसभेच्या निवडणुका सारख्या समजल्या जातात. सर्वाधिक मतदार हे शहरी भागात असते. त्यामुळे जसे ग्रामीण भागचा विकासला प्राधान्य मिळते तसेच शहरीभागाकडे सतत लक्ष देणे अपेक्षित आहे. सध्याला महानगरपालिकेच्या निवडणुक प्रक्रिया चालू आहे यात रणधुमाळी मोठ्या प्रमाणात दिसत आहे. सभेला मोठ्या प्रमाणात खर्च होत असणार याकडे लक्ष देणे अपेक्षित आहे. अनेक दिग्गजांची जर भाषणे एकली तर पाच वर्षापुर्वी जे बोलले त्याचीच पुर्नरावृत्ती दिसून येते. समस्या त्याच, भाषणे तीच असे होत असेल तर यावर आता मतदार नागरिकांनी ठोस अशी उपयोजना आखली पाहिजे. कायम स्वरूपी समस्या सोडविणारा उमेदवार निवडला पाहिजे. पुर्वीची जुनी असलेजह त्यांनी अनेक काळ नगरसेवक म्हणून कार्यरत होते. त्यांची अजूनही केलेली कामे मजबुत स्थितीत आहेत. मग आलिकडील कामात गुणवत्ता का दिसून येत नाही. याचा शोध घेतला पाहिजे. जनतेचा पैसा यात वाया जातो ही बाब लक्षात घेतली पाहिजे. नगरसेवक हा दर पाच वर्षांनी निवडला जातो. सध्याला निवडवयाचे नगरसेवक हे आपल्या प्रभागात कार्यरत असणारे सतत भेटणारे असावेत. प्रभाग म्हणजे मोठा नसतो, त्यात आपल्याच प्रभागात राहणारे नगरसेवक निवडले जातात. त्यामुळे विचारपुर्वक मतदाराची गरज आहे. निवडणुकीत विचाराची देवाण-घेवाण होते. त्यातून योग्य वाटणाऱ्यास मत दिले पाहिजेत. मतदान करणे हे कर्तव्य आहे. त्यामुळे मतदानापासून कोणीही वंचित राहू नये. वेळ काढून मतदान करावे. त्यात शासनाने सार्वजनिक सुट्टी जाहिर केली आहे. त्यामुळे मतदान मोठ्या प्रमाणात होणे अपेक्षित आहे. असे झाले तर योग्यच उमेदवार निवडला जावू शकेल. मनात खंत राहणार नाही. सध्याला योग्य व्यक्तीची मोठी गरज आहे. मागील अनेक दिवसापासून पक्षाचे व उमेदवाराचे विचार एकले असतील. कोण योग्य आहे. त्याचा विचार करून मतदान केले पाहिजे. अनेकांचे जाहिरनामे, वचननामे वाचली असतील. त्यामुळे विचाराचे मंथन करून मतदानाचाहक्क बजावला पाहिजे. आपल्या भागातील समस्या सोडविणार व किमान नियमित भेटणारा नगरसेक निवडला पाहिजे. पाच वर्षांनी मिळणारी संधी कोणीही सोडू नये. काही झाले तरी आपल्या महानगरपालिकेत योग्य व्यक्तीची निवड करणे आपल्या हाती आहे. विकास साधणारा नगरसेवक निवडला जाणे अपेक्षित आहे. त्यामुळे आपल्या शहराचा विकास आपल्याहातून होण्यासाठी योग्य उमेदवार निवडण्याची संधी लोकशाहीने दिली आहे. तीचा योग्य उपयोग होणे अपेक्षित आहे. सध्याला उमेदवारासमावेत जनतेचा सहभाग कमी होत आहे. जनतेचा उत्साह अपेक्षित आहे. तरच लोकशाही सदृढ होण्यात मदत होणार आहे.

# आहारात समाविष्ट करा काळे गहू, आरोग्याला मिळतील प्रचंड फायदे



तुम्ही कधी काळे गहू खाल्लेत का? काळा गहू शरीरासाठी खूपच फायदेशीर आहे. सामान्य गव्हापेक्षा वेगळा असण्यासोबतच त्याच्या पिठापासून बनवलेल्या चपात्याही काळ्या असतात. हा गहू पोषक तत्वांनी समृद्ध आहे. त्यात झिंक, प्रथिने, तांबे, फायबर, कॅल्शियम, पोटॅशियम आणि व्हिटॅमिन बी१ आढळते. या गहूच्या सेवनाने पचनसंस्थेशी संबंधित समस्या कमी होतातच, शिवाय शरीराचा अशक्तपणाही दूर होतो.

शरीर निरोगी ठेवण्यासोबतच, ते शरीराचे अनेक आजारांपासून संरक्षण करते. याच्या सेवनाने हृदयाशी संबंधित आजारांचा धोका कमी होतो आणि कोलेस्टेरॉलची पातळी देखील नियंत्रित राहते. आतड्यांमध्ये मल मऊ करून बद्धकोष्ठतेची समस्या दूर करते. आज आपण काळे गहू खाण्याचे इतर फायदे जाणून घेऊया

पचनसंस्थेसाठी फायदेशीर-

जर नियमित गव्हाची चपाती खाल्ल्याने बद्धकोष्ठता होत असेल, तर तुमच्या आहारात काळ्या गव्हाची चपाती समावेश करा. ही चपाती खाल्ल्याने केवळ बद्धकोष्ठता दूर होत नाही तर मल मऊ होतो आणि पोट स्वच्छ होण्यास मदत होते. त्यातील फायबरचे प्रमाण पचनक्रिया निरोगी राखण्यास मदत करते.

डायबिटीससाठी फायदेशीर-

डायबिटीसमध्ये काळ्या गव्हाची चपाती खाल्ल्यास ते रक्तातील साखर कमी करण्यास आणि शरीर निरोगीराखण्यास मदत करते. ज्यांना मधुमेह नाही त्यांच्यासाठी, काळ्या गव्हाचे सेवन केल्याने मधुमेह होण्याचा धोका कमी होतो आणि निरोगी शरीर राखले जाते.

हृदयासाठी फायदेशीर-

काळ्या गव्हात मॅग्नेशियम भरपूर असते. जे निरोगी हृदय राखण्यास मदत करते आणि कोलेस्ट्रॉल नियंत्रित करते. त्याच्या सेवनाने हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोक सारख्या हृदयाशी संबंधित आजारांचा धोका कमी होतो. काळ्या गव्हाचे सेवन उच्च रक्तदाब नियंत्रित करण्यास देखील मदत करते.

अशक्तपणा कमी करते-

काळ्या गव्हात लोह भरपूर प्रमाणात असते.जे फक्तअशक्तपणा कमी करण्यास मदत करत नाही तर शरीराला शक्ती देखील प्रदान करते. ते खाल्ल्याने आरोग्य सुधारतेच शिवाय अनेक रोगांचा धोका देखील कमी होतो. त्यामुळे शरीराची ऑक्सिजन पातळी देखील सुधारते.

# प्रेग्नेंसीमध्ये नियमित खा तोंडलीची भाजी, दूर होतील विविध समस्या



गरोदरपणात महिलांनी त्यांच्या आहाराची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. या काळात महिलांनी केवळ स्वतःच्या आरोग्याचीच नव्हे तर त्यांच्या गर्भाशयात वाढणाऱ्या बाळाचीही काळजी घेणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत, हिरव्या भाज्या आरोग्यासाठी फायदेशीर मानल्या जातात. यामध्ये तोंडलीचादेखील समावेश होतो.

अनेकांना तोंडली खायला फारशी आवडत नसेल, परंतु योग्यरित्या बनवल्यावर ते चव आणि आरोग्यासाठी फायदेशीर असते. तोंडलीमध्ये भरपूर पोषक तत्वे असतात जी गर्भधारणेदरम्यान महिलांना निरोगी ठेवण्यास आणि आरोग्याच्या समस्या कमी करण्यास मदत करू शकतात. आज आपण गरोदरपणात तोंडली खाण्याचे फायदे जाणून घेऊया..

रक्तदाब नियंत्रित करते- गर्भधारणेदरम्यान तुम्ही तुमच्या रक्तदाबावर देखील लक्ष ठेवले पाहिजे. तोंडली हा पोटॅशियमचा एक चांगला स्रोत आहे. त्यामुळे ते रक्तदाब नियंत्रित ठेवते. अशा प्रकारे, ते प्रेग्नेंसीसाठी खूप फायदेशीर ठरू शकते.

वजन नियंत्रित करते- प्रेग्नेंसीमध्ये वजन नियंत्रित करणे अवघड होते. त्यामुळे पौष्टिक आहार घेणे आवश्यक असते. तोंडलीमध्ये कॅलरीज कमी आणि आहारातील फायबर जास्त असते. त्यामुळे ते खाणे फायदेशीर असते.

फायबरने समृद्ध-

तोंडलीमध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते. जे गर्भधारणेदरम्यान एक सामान्य समस्या असलेल्या बद्धकोष्ठतेला दूर करून चांगले पचन राखण्यास मदत करते.यामुळे पचनक्रिया सुधारते. आणि पोटाच्या विविध समस्या दूर होतात.

# लोखंडी की मातीची कोणत्या भांड्यात अन्न शिजवणे जास्त फायदेशीर? जाणून घ्या



भारतीय संस्कृतीमध्ये प्राचीन काळी लोक स्वयंपाकासाठी मातीच्या भांड्यांचा वापर करत असत. पण बदलत्या काळानुसार लोखंडी आणि स्टीलच्या भांड्यांचाही वापरसुरू झाला. आजकाल सोशल मीडियामुळे काचेच्या भांड्यांचा वापर करण्याची क्रेझही प्रचंड वाढली आहे. पण तुम्हाला माहित आहे का की चुकीच्या भांड्यांचा वापर केल्याने तुमच्या आरोग्यालाही हानी पोहोचू शकते.

काही भांड्यांमध्ये जास्त रासायनिक संयुगे असतात. म्हणून, जेव्हा तुम्ही त्यात गरम काहीतरी शिजवता तेव्हा भांड्यांमधील संयुगे अन्नात देखील जातात. यामुळे आजारांचा धोका वाढू शकतो. म्हणूनच, बरेच लोक माती आणि लोखंडी भांडी वापरण्यास प्राधान्य देतात. पण तुम्हाला माहिती आहे का यापैकी कोणते भांडे आरोग्यासाठी चांगले आहे. आज आपण याबाबतच जाणून घेऊया.

लोखंडी भांड्यांचे फायदे-

लोखंडी भांड्यांमध्ये स्वयंपाक केल्याने अन्नात लोह शोषण्यास मदत होते. जर तुमच्यात लोहाची कमतरता असेल तर ती वापरल्यास फायदा मिळेल. लोखंडी भांडी रसायनमुक्त असतात, त्यामुळे ती शिजवण्यास सुरक्षित असतात. ती बराच काळ टिकतात आणि शरीराला विविध फायदे देखील देतात.

मातीच्या भांड्याचे फायदे-

मातीच्या भांड्यांमध्ये स्वयंपाक करणेदेखील आरोग्यदायी आहे. ते अन्नाची चव आणि पोषक तत्वे दोन्ही वाढवतात. ते अन्न अजिबात कोरडे करत नाही. मातीच्या भांड्यांमध्ये स्वयंपाक केल्याने अन्न बराच काळ गरम राहते. यामुळे अन्नातून विषबाधा किंवा रासायनिक प्रक्रिया होत नाही.

आरोग्यासाठी लोखंडी भांडी की मातीची भांडी जास्त चांगली?

दोन्ही प्रकारची भांडी स्वयंपाकासाठी फायदेशीर आहेत. परंतु तज्ज्ञांच्या मते, लोखंडी भांडी अधिक फायदेशीर मानली जातात. स्वयंपाकासाठी फक्त मर्यादित भांडी वापरा. जर तुम्ही जास्त प्रमाणात लोहाचे सेवन करत असाल तर, तुम्ही जास्त लोखंडी भांडी टाळावीत. अशा परिस्थितीत तुम्ही मातीची भांडी वापरू शकता.

# मासिक पाळीत थकवा आणि अशक्तपणा जाणवतोय? एनर्जीसाठी खा 'हे' पदार्थ



मासिक पाळी दरम्यान महिलांना विविध आरोग्य समस्यांना तोंड द्यावे लागते. ज्याचा थेट परिणाम त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होतो. मासिक पाळी दरम्यान महिलांना पोटदुखी, पोटात गोळे येणे, अपचन, पोटफुगी आणि भूक न लागणे अशा समस्या सामान्य आहेत. पण काही महिलांना या समस्या खूप दिवस जाणवतात, तर काहींना मासिक पाळीनंतर कोणतीही आरोग्य समस्या येत नाही.

यासाठी महिलांनी मासिक पाळी दरम्यान त्यांच्या आहाराकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कारण या काळात जास्त रक्तस्त्राव होते ज्यामुळे त्यांना थकवा आणि अशक्तपणा जाणवू शकतो. त्यामुळेच आपण जाणून घेऊया की थकवा दूर करण्यासाठी मासिक पाळी दरम्यान महिलांनी त्यांच्या आहारात काय समाविष्ट करावे..

गूळ-

गूळ हा लोहाचा नैसर्गिक स्रोत आहे.जो मासिक पाळी दरम्यान थकवा आणि कमकुवतपणाशी लढण्यास मदत करू शकतो. शिवाय त्यातील उष्ण गुणधर्मामुळे त्याचा तुमच्या पोटावर उबदारपणाचा प्रभाव पडतो. ज्यामुळे मासिक पाळीशी संबंधित समस्या कमी होऊ शकतात.

पालक-

महिलांच्या शरीरात मासिक पाळी दरम्यान लोहाची कमतरता निर्माण होते. आणि ती कमतरता पुन्हा भरून काढणे त्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्वाच आहे. अशा परिस्थितीत, तुम्ही पालक सारख्या लोहयुक्त हिरव्या पालेभाज्यांचा तुमच्या आहारात समावेश करू शकता.

खजूर-

मासिक पाळी दरम्यान, महिलांना पॉट, कंबरदुखी आणि गोळे येतात. या समस्येपासून मुक्त होण्यासाठी, तुम्ही तुमच्या आहारात मॅग्नेशियमयुक्त खजूर समाविष्ट करू शकता. खजूर खाल्ल्याने मासिक पाळीतील गोळे कमी होण्यास मदत होते.

आले-

आल्यामध्ये अँटी इन्फ्लीमेंट्री आणि अँटिस्पास्मोडिक गुणधर्म असतात.जे मासिक पाळीतील गोळे कमी करण्यास आणि गर्भाशयाच्या आकुंचनांना शांत करण्यास मदत करतात.

केळी-

केळीमध्ये पोटॅशियम आणि मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असते. जे मासिक पाळी दरम्यान डिहायड्रेशन टाळण्यास आणि हातापायातील गोळे कमी करण्यास मदत करते.

# दिवसभरात कितीवेळा सनस्क्रीन लावावे? वापरण्यापूर्वी तुम्हालाही 'या' गोष्टी माहितीच हव्यात



अलीकडे सनस्क्रीन वापरण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. लोक सूर्याच्या अतिनील किरणांपासून संरक्षणासाठी सनस्क्रीन लावतात. सनस्क्रीनमुळे काळे डाग आणि अकाली वृद्धत्वाची लक्षणे टाळण्यास देखील मदत होते.

काही तज्ज्ञांच्या मते, सूर्यप्रकाशात जाण्याच्या ३० मिनिटे आधी तुम्ही सनस्क्रीन लावावे. सनस्क्रीन त्वचेत शोषून घेण्यासाठी काही वेळ लागतो. जर तुम्ही सनस्क्रीन लावला आणि लगेच उन्हात गेलात तर त्याचा परिणाम फारसा दिसून येत नाही. अनेकांना असा प्रश्न पडतो की, दिवसातून किती वेळा सनस्क्रीन लावावे. आज आपण याबाबतच जाणून घेऊया.

दिवसभरात कितीवेळा सनस्क्रीन लावावे-

दररोज सकाळी क्रिम किंवा लोशन लावल्यानंतर तुम्ही सनस्क्रीन लावावे. तुम्ही बाहेर जात नसलात तरीही तुमच्या त्वचेला सनस्क्रीनची आवश्यकता असते. एकदा सनस्क्रीन लावून तुम्ही दिवसभर सूर्यापासून स्वतःचे संरक्षण करू शकत नाही. त्यामुळे घरी दिवसातून २ ते ३ वेळा लावावे. तुम्ही फील्डवर्क करत असाल तर तुम्ही दर दोन तासांनी सनस्क्रीन पुन्हा लावणे गरजेचे आहे.

सनस्क्रीन कुठे लावावे?

तज्ज्ञांच्या मते तुम्ही हात, पाय, अंडरआर्म्स, मान, कानामागील भाग, पापण्या, चेहरा आणि पोट अशा भागांवर सनस्क्रीन लावावे. परंतु, चेहऱ्यासाठी सनस्क्रीन शरीराच्या सनस्क्रीनपेक्षा वेगळे असते. चेहऱ्यासाठी असे सनस्क्रीन निवडा ज्यामुळे पिंपल्स येणार नाहीत. जर तुमची त्वचा संवेदनशील असेल, तर सनस्क्रीन निवडण्यापूर्वी तुम्ही तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

सनस्क्रीनपूर्वी मॉइश्चरायझर लावणे आवश्यक आहे का?

सनस्क्रीनपूर्वी मॉइश्चरायझर लावणे अनेक कारणांमुळे फायदेशीर ठरू शकते. पहिले म्हणजे, मॉइश्चरायझर त्वचेला हायड्रेट ठेवते आणि सनस्क्रीन समान रीतीने पसरण्यास मदत करते. मॉइश्चरायझर न वापरल्याने त्वचेची जळजळ किंवा कोरडेपणा येऊ शकतो, विशेषतः कोरडी किंवा संवेदनशील त्वचा असलेल्यांसाठी. कोरड्या त्वचेवर थेट सनस्क्रीन लावल्याने ते लावणे कठीण जाते. ज्यामुळे काही भाग सूर्याच्या किरणांच्या संपर्कात राहतात.

काही सनस्क्रीनमध्ये मॉइश्चरायझिंग गुणधर्म देखील असतात, जे त्वचेला हायड्रेट ठेवण्यास मदत करतात. जर तुमची त्वचा तेलकट किंवा सामान्य असेल, तर तुम्ही मॉइश्चरायझरशिवाय सनस्क्रीन वापरू शकता. जर ती मॉइश्चरायझिंग सनस्क्रीन असेल तर पुन्हा मॉइश्चरायझरची गरज नाही.

# पर्यावरण योद्धा अखेर हरपला...



परदेशात शिक्षण घेतल्यानंतर तिथेच नोकरी करून स्थायिक होण्याचा तरुणाईचा कल असतो. असे असताना परदेशातील उच्च पदाच्या नोकर्या सोडून आपल्या ज्ञानाचा वापर देशासाठी करणार्यांमध्ये माधव गाडगीळ यांचे नाव महत्वाचे. पश्चिम घाट संरक्षण-संवर्धनासाठी अखेरच्या श्वासापर्यंत लढणार्या पर्यावरणशास्त्रज्ञ माधवरावांनी अखेरचा निरोप घेतला. पश्चिम घाट संवर्धन आणि संरक्षण हीच त्यांना खरी आदरांजली ठरावी.

पश्चिम घाटांच्या संवर्धनासाठी दूरदर्शी दृष्टिकोनासाठी ओळखले जाणारे ज्येष्ठ पर्यावरणवादी माधव गाडगीळ यांचे गुरुवारी पुण्यात निधन झाले. दीर्घकालीन आजाराशी सुरू असलेली झुंज अखेर संपली. गाडगीळ यांनी तळागाळातील पर्यावरण चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावली. भारतात तळा-गाळातील पर्यावरण चळवळीला आकार देण्यात त्यांचा मोठा वाटा होता. काही वर्षांपूर्वी त्यांनी पश्चिम घाटातील पायाभूत सुविधा आणि मोठ्या प्रमाणात विकास प्रकल्पांमुळे गंभीर नैसर्गिक आपत्ती येतील, असा इशारा दिला होता. केरळमधील वायनाडसारख्या दुर्घटनांचा इशारा त्यांनी अगोदरच दिला होता. पश्चिम घाटात विकास, खाणी करताना आपल्याला काय किंमत मोजावी लागेल. याची जाणीव त्यांनी फार अगोदरच करून दिली होती. गोव्यातील खाणी आणि पर्यावरण हा मुद्दा जेव्हा पुढे आला, तेव्हा त्यांनी खाणीतून संपत्ती मिळेल; परंतु गोव्याचे वायनाड व्हायला वेळ लागणार नाही, असा इशारा दिला होता. सरकार कुणाचे आहे आणि सत्तेत कोण आहे, याचा त्यांना कधीच फरक पडला नाही. त्यांनी कायम सामान्य माणूस आणि पर्यावरण रक्षणाची पताका उंचावली.

२०११ मध्ये त्यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात आलेल्या प्रशंसित गाडगीळ अहवालात उद्योग आणि हवामान संकटाच्या वाढत्या दबावादरम्यान पश्चिम घाट सारख्या पर्यावरणीयदृष्ट्या नाजूक प्रदेशांचे संरक्षण करण्याची शिफारस करण्यात आली होती. गाडगीळ समितीच्या अहवालातील बहुतेक शिफारशी अद्याप अंमलात आणल्या गेलेल्या नाहीत; परंतु त्यानंतरच्या आपत्तींनी त्यांची दूरदृष्टी सिद्ध केली आहे. गाडगीळ यांना २०२४ मध्ये संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (यूएनईपी) कडून 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हार्वर्ड विद्यापीठापासून ते भारत सरकारच्या धोरणात्मक प्रणालीपर्यंतच्या त्यांच्या सहा दशकांच्या कारकिर्दीत, गाडगीळ नेहमीच स्वतःला 'लोकांचे शास्त्रज्ञ' मानत असत.

२०२१मध्ये दिलेल्या एका मुलाखतीत गाडगीळ म्हणाले होते, की पश्चिम घाट आणि हिमालयात वारंवार येणार्या आपत्ती अभूतपूर्व नाहीत. जंगलतोड आणि पर्वत उतारांशी छेडछाड केल्यामुळे अशा घटना वाढल्या आहेत. पश्चिम घाटांपेक्षा हिमालय अधिक नाजूक असल्याचे सांगून त्यांनी भूस्खलन आणि धूपाच्या धोक्यांकडेही लक्ष वेधले. गाडगीळ यांच्या संशोधनाचा उपेक्षित समुदायांच्या हक्कांचे संरक्षण, समुदाय-आधारित पर्यावरणीय संवर्धन आणि उच्चस्तरीय धोरणनिर्मितीवर परिणाम झाला. त्यांनी सात पुस्तके आणि किमान २२५ वैज्ञानिक पेपर्स लिहिले. एक संवेदनशील शास्त्रज्ञ म्हणून त्यांनी समाजाची दिशा बदलण्यात योगदान दिले, त्याचे त्यांना त्यांना समाधान होते. २०११ मध्ये, पश्चिम घाट पर्यावरणतज्ज्ञ पॅनेलचे अध्यक्ष म्हणून, गाडगीळ यांनी एक लाख २९ हजार ३७ चौरस किलोमीटर क्षेत्रापैकी ७५ टक्के क्षेत्र पर्यावरण-संवेदनशील म्हणून घोषित करण्याची शिफारस केली. या शिफारशीला अनेक राज्यांनी खूप कठोर मानून विरोध केला. त्यानंतर कस्तुरीरंगन समितीने हे क्षेत्र ५० टक्क्यांपर्यंत कमी केले आणि कालांतराने त्यांच्या शिफारसी सौम्य केल्या गेल्या. पश्चिम घाटाच्या पर्यावरण-संवेदनशील क्षेत्रांबाबत अंतिम अधिसूचना अद्याप जारी केलेली नाही. केरळमधील वायनाड सारखे क्षेत्र, जिथे २०२४ मध्ये भूस्खलनात शेकडो लोकांचा मृत्यू झाला होता, ते गाडगीळ पॅनेलच्या शिफारशींमध्ये समाविष्ट करण्यात आले. गाडगीळ यांनी केवळ पश्चिम घाट आणि सायलेंट व्हॅलीच्या संवर्धनात महत्त्वाची भूमिका बजावली नाही, तर भारतीय पर्यावरणीय विज्ञानाला एक नवीन दिशा दिली. गाडगीळ यांना लहानपणापासूनच निसर्ग आणि पक्ष्यांमध्ये खूप रस होता. पक्षीनिरीक्षक असलेले त्यांच्या वडिलांनी पर्यावरणशास्त्राबद्दल गाडगीळ यांच्या कुतूहलाला आणखी चालना दिली. विज्ञान हे केवळ शैक्षणिक प्रयोगशाळांसाठी नाही, तर समाजासाठी असले पाहिजे असा त्यांचा विश्वास होता. गाडगीळ यांनी भारतीय विज्ञान संस्थेत पर्यावरण विज्ञान केंद्राची स्थापना केली आणि आदिवासी, शेतकरी आणि मच्छीमारांच्या सहकार्याने काम केले. अनियंत्रित खाणकाम आणि जंगलतोडीमुळे भूस्खलन, पूर आणि दीर्घकालीन नुकसान होईल, असा इशारा गाडगीळ यांनी दिला होता. त्यांचा अहवाल राजकीयदृष्ट्या गैरसोयीचा ठरला; परंतु काही वर्षांनंतर केरळसह देशाच्या अनेक भागात भूस्खलन आणि पूर आल्यावर त्यांचे भाकीत खरे ठरले.

माधव गाडगीळ यांचे जीवन सिद्ध करते, की वैज्ञानिक विचार आणि धोरण बदलासाठी संयम आणि लोकसहभाग आवश्यक आहे. गाडगीळ केवळ एक शास्त्रज्ञ नव्हते, ते एक लेखक, शिक्षक, मार्गदर्शक आणि समाजसुधारकदेखील होते. त्यांनी स्थानिक समुदायांना संवर्धनाच्या केंद्रस्थानी ठेवले. त्यांनी धोरणकर्ते आणि कंपन्यांपेक्षा सामान्य लोकांना प्राधान्य दिले. त्यांनी पश्चिम घाट आणि सायलेंट व्हॅलीसारख्या चळवळींमध्ये निर्णायक भूमिका बजावली. त्यांनी आधुनिक विज्ञान आणि पारंपारिक ज्ञान दोन्ही एकत्रित केले. गाडगीळ यांचे जीवन विज्ञान, शिक्षण आणि समाजसेवेसाठी समर्पित होते. त्यांनी त्यांच्या सहा दशकांच्या वैज्ञानिक कारकिर्दीत पर्यावरण संवर्धन क्षेत्रात असाधारण योगदान दिले आहे. लहानपणी त्यांनी वडिलांसोबत जलविद्युत प्रकल्प आणि जंगलतोड यासारख्या समस्या जवळून पाहिल्या. त्यांच्या वडिलांनी गाडगीळ यांच्या जीवनाला आकार दिला. औद्योगिक विकासाची किंमत पर्यावरणीय विनाश आणि स्थानिक लोकांच्या दुःखाच्या स्वरूपात मोजावी का? असा प्रश्न ते कायम करीत. त्यामुळे त्यांना अनेकांनी विकासविरोधक ठरवले; परंतु त्याची त्यांना तमा नव्हती. आपल्या सिद्धांताला वैज्ञानिक आधार आहे आणि सामान्य लोकांचे कल्याण हाच आपल्या विचाराचा मूळ पाया आहे, यावर ते ठाम होते.भारताच्या पहिल्या 'बायोस्फीअर रिझर्व्ह'च्या स्थापनेत गाडगीळ यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. वनवासी, मच्छीमार आणि शेतकर्यांसोबत काम करून त्यांनी पर्यावरणीय संवर्धनासाठी एक मॉडेल विकसित केले. पुण्यात जन्मलेल्या गाडगीळ यांचे शिक्षण मुंबई आणि हार्वर्ड येथे झाले. तिथे त्यांनी पर्यावरणशास्त्रात पीएच. डी. मिळवली आणि नंतर ते अध्यापन करू लागले. १९७० च्या दशकाच्या सुरुवातीला, त्यांनी आणि त्यांच्या पत्नी सुलोचना (ज्यांनी हार्वर्डमधून गणितात पीएचडी देखील मिळवली) यांनी अमेरिकेतील शास्त्रज्ञांना मिळणारे विशेषाधिकार आणि प्रतिष्ठा सोडून भारतात काम करण्यासाठी स्वतःला समर्पित करण्याचा निर्णय घेतला. 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स'चे संचालक सतीश धवन यांनी त्यांची बुद्धिमत्ता आणि आवड ओळखली आणि त्यांना संस्थेच्या बेंगळुरू कॅम्पसमध्ये दोन्ही पदे देऊ केली. तिथे सुलोचना यांनी वातावरणीय विज्ञान केंद्र स्थापन करण्यास मदत केली आणि पावसाळ्यावर काही उल्लेखनीय काम केले. माधवरावांनी पर्यावरण विज्ञान केंद्राची स्थापना केली. तिथे त्यांनी काही अपवादात्मक हुशार तरुण शास्त्रज्ञांना मार्गदर्शन केले. त्यांनी गणितीय पर्यावरण शास्त्रापासून पर्यावरणीय क्षेत्रकार्यात संक्रमण केले होते. त्यांनी बांदीपूर राष्ट्रीय उद्यानात हत्तींच्या वर्तनाचा अभ्यास केला. प्राणी पर्यावरणशास्त्राच्या अभ्यासात त्यांना राष्ट्रीय उद्यानांजवळ राहणार्या आदिवासी आणि शेतकर्यांमधील संघर्षांना सामोरे जावे लागले आणि अशा बाबींमध्ये सरकारी धोरण व्यावसायिक हितसंबंधांना अत्यंत पक्षपाती आणि शेतकरी, गुराखी आणि कारागीर यांच्याबद्दल उदासीन असल्याचे पाहून त्यांना धक्का बसला. गाडगीळ समितीच्या अहवालात पश्चिम घाटातील संवेदनशील जंगले आणि डोंगर उतारांना खाणकाम आणि इतर विध्वंसक कारवायांपासून संरक्षण करण्याची शिफारस करण्यात आली होती. संबंधित बाबींवरील निर्णयांमध्ये स्थानिक लोक आणि पंचायतींनी सहभागी होण्याची गरज यावर भर देण्यात आला होता. कंत्राटदार, राजकारणी आणि नोकरशहा या कुप्रसिद्ध त्रिकुटाने गाडगीळ अहवालाला जोरदार विरोध केला होता; परंतु विविध क्षेत्रातील लोकांनी त्याचे स्वागत केले होते. जर तो अहवाल लागू केला असता, तर केरळ, कर्नाटक आणि गोवा सारखी राज्ये पुराच्या विध्वंसातून वाचली असती.

माधवराव ज्या व्यक्तीचा सर्वात जास्त आदर करत, ती म्हणजे फादर सेसिल जे. सलदान्हा. ख्रिश्चन धर्मगुरू असलेल्या सलदान्हा यांनी कर्नाटकातील समृद्ध वनस्पतींवर एक पुस्तक लिहिले. गाडगीळ यांच्याकडे खोल सामाजिक जाणीव होती. त्यांचे वडील, प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ धनंजयराव गाडगीळ यांना मानवी हक्कांमध्ये खूप रस होता. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रभावित होते. माधवरावांच्या पत्नी, प्रसिद्ध हवामानशास्त्रज्ञ सुलोचना गाडगीळ यांचे पाच महिन्यांपूर्वीच निधन झाले. माधवरावांच्या निधनाने देशाने केवळ एक महान शास्त्रज्ञच नाही, तर पर्यावरण आणि समाज यांच्यात पूल बांधणारा एक शक्तिशाली आणि संवेदनशील आवाजही गमावला आहे. डॉ. सुलभा ब्रम्हो या त्यांच्या भगिनीही अर्थशास्त्रज्ञ होत्या. त्यांचेही पाच वर्षांपूर्वीच निधन झाले. गाडगीळ कुटुंबावर एकामागून एक असे आघात होत गेले.

**-मिलिंद बेंडाळे**



# सकाळी अंथरूणातून उठताच दिसतात स्ट्रोकची 'ही' लक्षणे

## 'या' एका चाचणीने ओळखा लक्षणे आणि चुकूनही करू नका दुर्लक्ष

स्ट्रोकच्या सुरूवातीच्या लक्षणांकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. ही लक्षणे साधारणपणे सकाळी उठल्यावर स्पष्टपणे दिसतात आणि जाणवतात. सकाळच्या वेळी दिसतात ब्रेन स्ट्रोकची अशी लक्षणे

सकाळच्या वेळी दिसतात ब्रेन स्ट्रोकची अशी लक्षणे

एरीश्रू चेींपळपस डळसपी जष ईीरळप डीीज्ञश: स्ट्रोक ही एक मेडिकल एमर्जन्सी आहे. यामध्ये मेंदूला होणारा रक्तपुरवठा अचानक थांबतो किंवा कमी होतो. यामुळे मेंदूला ऑक्सिजन आणि आवश्यक पोषक तत्वांचा अभाव होतो. जर त्वरित उपचार केले नाहीत तर मेंदूचे नुकसान, अर्धांगवायु आणि जीवघेणी गुंतागुंत होऊ शकते. तज्ज्ञ सांगतात की, स्ट्रोकच्या सुरूवातीच्या लक्षणांकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. ही लक्षणे साधारणपणे सकाळी उठल्यावर स्पष्टपणे दिसतात आणि जाणवतात.

स्ट्रोक का येतो?

स्ट्रोकचे दोन मुख्य प्रकार आहेत. पहिला म्हणजे इस्केमिक स्ट्रोक. यामध्ये मेंदूतील रक्तवाहिनीत रक्ताची गुठळी तयार होते. दुसरा म्हणजे रक्तस्त्राव. यामध्ये रक्तवाहिनी फुटते किंवा गळते. एखादा मिनी स्ट्रोक किंवा टीटीए देखील आहे, जो भविष्यात मोठ्या स्ट्रोकचा धोका दाखवतो. हाय ब्लड प्रेशर, डायबिटीज, लठ्ठपणा, हृदयरोग, शारीरिक हालचालींचा अभाव आणि अति मद्यपान ही प्रमुख कारणे आहेत.

सकाळी दिसतात स्ट्रोकची लक्षणे

तज्ज्ञांच्या मते, कधीकधी सकाळी उठताच स्ट्रोकची लक्षणे स्पष्ट दिसतात. जर तुमच्या चेहऱ्याची एक बाजू सैल किंवा वाकडी वाटत असेल किंवा हसताना तुमचा चेहरा असमान दिसत असेल तर सावध राहा. अचानक अशक्तपणा, सुन्नपणा किंवा हात किंवा पाय तसंच शरीराच्या एका बाजूला झटके येणे हे स्ट्रोकचे लक्षण असू शकते.

अचानक बोलण्यामध्ये अडचण येणे हे देखील स्ट्रोकचे लक्षण आहे. बोलण्यात अडचण येणे, समजत नसणे किंवा सांधी वाक्ये पुन्हा पुन्हा सांगण्यास अडचण येणे हे हलक्यात घेऊ नका. अचानक दृष्टी कमी होणे, दुहेरी द-ष्टी येणे किंवा एका डोळ्यातील दृष्टी पूर्णपणे कमी होणे हे देखील स्ट्रोकचे लक्षण असू शकते.

काही लोकांना सकाळी अचानक गोंधळ, होलण्यात अडचण, संतुलन बिघडणे किंवा चालताना अडखळणे असा अनुभव येऊ शकतो. वृद्ध प्रौढांमध्ये ही लक्षणे अधिक सौम्य असू शकतात. अचानक थकवा, शांतता, वर्तनात बदल किंवा दैनंदिन कामे करण्यात अडचण अशी लक्षणे दिसतात.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



आईकडून बाळाला तसंच ब्रेस्टफीडिंग करताना बाळाला हा रोग होऊ शकतो. जरूर वाचा: आईकडून बाळाला संक्रमित होणार्या HIV च्या धोक्याबाबत म१०२ प्रश्न व त्याची एक्सपर्ट उत्तरं ! हा व्हायरस अधिक काळ माणसाच्या शरीराच्या बाहेर राहत नाही. शरीरातील ज्या द्रवात याची उत्पत्ती होते ते सुकल्यावर हा व्हायरस पटकन मरतो. त्यामुळे हा आजार किटाणूंपासून होत नाही. आणि तापाच्या व्हायरस सारखा तो पसरत ही नाही.**टीप:** असुरक्षित लैंगिक संबंध टाळल्यास आणि योग्य ती स्वच्छता पाळल्यास आपण एचआयव्हीला प्रतिबंध करू शकतो.

## २ Joke विनोद





मला कपडे तरी काढू द्या...

बसच्या ड्रायवरने गियर टाकून बस पुढे काढताच, मागून एक मंजुळ आवाज आला. 'ड्रायवर साहेब, एक मिनिट थांबा ना, मला कपडे तरी काढू द्या....

बसमधील सर्व लोकांची नजर मागच्या बाजूस वळाली...

ती बाई धोबीन होती, आपले कपड्याचे गाठुडे खाली उतरवत होती...

## ३ Message संदेश




Najoomi: Aap Ny Kal Hi 10 Kilo Chawal Kharide Hen..
Admi: Aap Mahaan Hai Maha-raj,
Aap Sab Janty Hen.
Najoomi: Saaly Agli Baar Apni Kundli Lana,
Nahi..

## ४ Thought सुविचार




छटाकभर प्रेम शेरभर ज्ञानापेक्षा वरचढ असते.

**- जॉन वेरली**

**संस्कृत सुभाषित**

अभ्यासेन कटुद्रव्यं भवत्यभिमतं मुने । अन्यस्मै रोचते निम्बमन्यस्मै मधु रोपते ।।अर्थ : हे ऋषीवर्या, अभ्यासाने कडू द्रव्यसुद्धा आवडीचे होते. सतत सेवन केल्याने कडुनिम्बसुद्धा आवडू लागतो.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक


### उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रसवान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत




# स्मिता पाटील आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सव




## ऑस्करच्या सर्वोत्कृष्ट पुरस्कारासाठी चार भारतीय चित्रपट ठरले पात्र

लॉस एंजलिस : ऑस्कर पुरस्कारासाठी चार भारतीय चित्रपट पात्र ठरले आहेत. त्यामध्ये कानडी चित्रपट कंरता ए लिजंड चॅप्टर १, हिंदी चित्रपट तन्वी द ग्रेटसह २०१ चित्रपट सर्वोत्कृष्ट चित्रपट पुरस्कार श्रेणीसाठी पात्र ठरले आहेत. अकादमी ऑफ मोशन पिक्चर आर्टस आणि सायन्सने २०२६ मध्ये होणार्या ९८ व्या ऑस्कर पुरस्कार सोहळ्यासाठी पात्र चित्रपटांची यादी जा-हीर केली. अन्य दोन भारतीय चित्रपटांमध्ये महाअवतार नरसिंहा आणि तामिळचा टुरिस्ट फॅमिली पात्र ठरला आहे. मराठमोळी अभिनेत्री राधिका आपटे यांची भूमिका असलेला सिस्टर मिडनाईट हा भारत आणि ब्रिटन यांनी संयुक्तपणे तयार केलेला चित्रपट आहे. त्याचाही यादीत समावेश आहे. देश आणि विदेशातील एकूण ३१७ चित्रपटांपैकी २०१ चित्रपटांचा हे सर्वोत्कृष्ट चित्रपट पुरस्कार श्रेणीसाठी विचार केला गेला आहे.

पुणे : आरोग्य सेनेतर्फे उद्या (शनिवार) आणि रविवार १२ वा 'स्पिफ' अर्थात 'स्मिता पाटील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. या लघुपट महोत्सवात जगभरातील लघुपट पाहण्याची संधी रसिकांना मिळणार आहे, अशी माहिती आरोग्य सेनेतर्फे देण्यात आली.

हा महोत्सव उद्या (शनिवारी) सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत व रविवार सकाळी ९ ते सायंकाळी ७ या वेळेत राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय होणार आहे. या दोन दिवसांत अंतिम फेरीसाठी निवडण्यात आलेले, २७ भारतीय आणि २० भारताबाहेरील, असे एकूण ४७ लघुपट दाखवण्यात येणार आहेत. अंतिम फेरीतील चित्रपटांमधून परितोषिक विजेते निवडण्यात येणार आहेत. 'स्पिफ'चा पारितोषिक वितरण समारंभ रविवार सायंकाळी ७ वाजता, राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयात होणार आहे. या महोत्सवातून सर्वोत्कृष्ट लघुपट, सर्वोत्कृष्ट महितीपट प्रथम आणि द्वितीय क्रमांक, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक लघुपट व महितीपट, स्मिता पाटील फिमेल फिल्म मेकर अॅवॉर्ड, इंडियन आणि फॉरेन अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत. रोख रक्कम आणि सन्मान चिन्ह असे या पारितोषिकांचे स्वरूप आहे. याचबरोबर काही 'ज्युरी स्पेशल अॅवॉर्डस' देखील दिली जातील. ही पारितोषिके आरोग्य सेनेचे राष्ट्रीय प्रमुख व 'स्पिफ' चे संस्थापक-संचालक डॉ. अभिजित वैद्य यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहेत.

जगभरातील अत्यंत प्रतिष्ठित चित्रपट महोत्सवांमध्ये 'स्पिफ' ने स्थान मिळवले आहे. या लघुपट महोत्सवासाठी या वर्षी भारतासहित जगातील एकूण ३७ देशांतून २०० पेक्षा अधिक लघुपट दाखल झाले. यात भारताव्यतिरिक्त अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, इराण, स्वित्झर्लंड, कॅनडा, इस्टोनिया, झेक रिपब्लिक, टर्की, मेक्सिको, इजिप्त, लेबॉनन, कझागिस्तान, इंडोनेशिया, फिलीपाईन्स, घाना, फ्रांस, स्पेन, चीन, मलेशिया, इटली, ब्राझिल, अर्जेंटीना, तैवान, थायलंड, प्युर्टो रिको, जपान, गोटेमाला, ग्रीस, आयर्लंड, कंबोडिया, इस्टोनिया, लुथियानिया, बेल्जियम, नेदरलँड, बांगला देश, ऑस्ट्रेलिया, ऑस्ट्रिया, अर्जेंटीना, इत्यादी देशांतील लघुपटांचा समावेश आहे.



# अगं अगं सूनबाई! काय म्हणताय सासूबाई?१६ जानेवारीपासून पडद्यावर




## चित्रपटाचे दिग्दर्शन केदार शिंदे यांनी केले असून सना शिंदे, उमेश कुमार बन्सल यांची निर्मिती

झी स्टुडिओज आणि सनफ्लॉवर स्टुडिओज निर्मित 'अगं अगं सूनबाई! काय म्हणताय सासूबाई?' या चित्रपटाचा भव्य ट्रेलर अनावरण सोहळा नुकताच झाला. हा चित्रपट स्त्री सशक्तीकरणावर भाष्य करणारा असल्याने या सोहळ्याला उपस्थित सर्व महिला पत्रकार, चित्रपटाच्या तंत्रज्ञ टीममधील महिला यांच्याद्वारे चित्रपटाच्या ट्रेलरचे अनावरण करण्यात आले. तसेच यादिवशी अभिनेत्री प्रार्थना बेहेरेचा वाढदिवस असल्याने संपूर्ण टीमने केक कापून तिचा वाढदिवसही साजरा केला.

सासू सुनेचं नातं हे अनेक कुटुंबात तुझं माझं जमेना, तुझ्यावाचून करमेना या प्रकारचं असतं.. तर काहींसाठी ' असून अडचण, नसून खोळंबा' अशा स्वरूपाचं असतं. थोडक्यात, घरोघरी मातीच्या चुली अशी परिस्थिती असते. पण, याहीपलिकडे जाऊन त्यांच्यात एक असाही भावनिक बंध असतो जो या नात्याची वीण कधीच सैल होऊ देत नाही. अशाच काहीशा भावना मांडणारा आणि या नात्याचे नवे पैलू उलगडणारा हा चित्रपट आहे.

दिग्दर्शक केदार शिंदे 'केसरी'शी बोलताना म्हणाले, 'अगं अगं सूनबाई! काय म्हणताय सासूबाई?' हा एक मनोरंजक व कौटुंबिक चित्रपट आहे. चौकोनी कुटुंबाची ही कथा आहे, त्यामुळे हा चित्रपट घरातील प्रत्येकासाठी आहे.

यात विनोद आहे, भावना आहेत आणि प्रत्येक घरात दिसणार्या सासू-सुनेच्या नात्याची ओळखीची परिस्थिती आहे. प्रेक्षकांना या नात्यातील गंमतीदार प्रसंग, भावनिक वळणे आणि दोन्ही व्यक्तिरेखांची ताकद अनुभवता येईल.

चित्रपटाचे दिग्दर्शन केदार शिंदे यांनी केले असून सना शिंदे, उमेश कुमार बन्सल यांची निर्मिती आहे. चित्रपटाची कथा आणि संवाद वैशाली नाईक व ओमकार मंगेश दत्त यांची असून पटकथा वैशाली नाईक यांची आहे. येत्या १६ जानेवारी पासून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.अगं अगं सूनबाई... काय म्हणता सासूबाई... चित्रपटाच्या ट्रेलर अनावरणप्रसंगी नवी मुंबईच्या मीताली मिलिंद सुर्वे यांनी रेखाटलेली रांगोळी प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत होती.

# धुरंधरचा ८३१ कोटींचा व्यवसाय पुष्पा -२ चा विक्रमही मोडला

मुंबई : धुरंधर चित्रपट बॉक्स ऑफिसवर सुपरहिट ठरला. हिंदी चित्रपटसृष्टीच्या इतिहासात प्रथमच ८३१ कोटी रुपयांहून अधिक व्यवसाय करुन एक विक्रम केला आहे. पुष्पा -२ या चित्रपटाच्या व्यवसायाचा विक्रमही मोडला आहे. गेल्या ३३ दिवसांत मंगळवारी ५ कोटी ७९ लाखांचा व्यवसाय झाला. धुरंधरची निर्मिती आदित्य धर यांनी केली आहे. मुख्य अभिनेते रणवीर सिंग यांनी सागितले की, चित्रपटाने ८३१ कोटी ४० लाख रुपयांचा व्यवसाय केला. हिंदी चित्रपटसृष्टीत प्रदर्शनातर हा चित्रपट व्यवसायात नंबर एक ठरला आहे. यापूर्वी २०२३ मध्ये अभिनेते अल्लू अर्जुनचा हिंदीतील चित्रपट पुष्पा- २ ने ८३० कोटींचा व्यवसाय केला होता. शाहरुख खानचा जवान आणि भय व विनोदी कथानक असलेला स्त्री २ यांनी अनुक्रमे ६४३ कोटींचा आणि ६२७ कोटीचा व्यवसाय केला होता.

धुरंधर चित्रपट पहिल्या आठवड्यात प्रचंड गाजला होता. तेव्हा २१८ कोटींचा, दुसर्या आठवड्यात २६१ कोटी ५० लाखांचा, तिसर्या आठवड्यात १८९ कोटींचा आणि चौथ्या आठवड्यात ११५ कोटी ७० लाखांचा व्यवसाय केला. पाचव्या आठवड्यात आणखी ३५ कोटी ८० लाखांचा व्यवसाय केला.




## दीपिका पदुकोणच्या प्री-बर्थडे सेलिब्रेशन पार्टीचे व्हिडिओ व्हायरल

मुंबई -बॉलिवूड अभिनेत्री दीपिका पदुकोण ५ जानेवारी रोजी तिचा ४०वा वाढदिवस साजरा करत आहे. सध्या अभिनेत्री न्यूयॉर्कमध्ये सुट्टी घालवत आहे, जिथे तिनं तिच्या कुटुंबासह नवीन वर्ष साजरे केले. दरम्यान काही दिवसांपूर्वी दीपिकानं मुंबईत आयोजित केलेल्या फॅन मीटमध्ये तिच्या चाहत्यांसह आधीच वाढदिवस साजरा केला होता. या फॅन मीटचे फोटो आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. या फोटोंमध्ये अभिनेत्री खूप खुश असल्याची दिसत आहे. दीपिकानं मुंबईत चाहत्यांसह प्री-बर्थडे सेलिब्रेशन पार्टी केली होती.

प्री-बर्थडे सेलिब्रेशन : या पार्टीचे व्हिडिओ आता अनेकांना आवडत आहेत. अनेकजण आता दीपिका पदुकोणला तिच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देत आहेत. अभिनेत्रीनं ही पार्टी मुंबईत १८ डिसेंबर २०२५ रोजी केली होती. या कार्यक्रमामध्ये दीपिकानं संपूर्ण भारतातील तिच्या चाहत्यांना एकत्र आणले होते. या प्री-बर्थडे सेलिब्रेशन पार्टीमधील अनेक क्लिप्समध्ये अभिनेत्री प्रत्येकांबरोबर उबदार संवाद साधताना दिसत आहे. याशिवाय ती विविध उपक्रमांमध्ये सहभागी होत आहे.



तसेच दीपिकाबरोबरचे अनुभव अनेकांनी आपल्या सोशल मीडिया पेजवर शेअर केले आहेत. हा कार्यक्रम दीपिकाच्या प्रत्येक चाहत्यांसाठी खूप विशेष होता.

दीपिका पदुकोणबद्दल : दरम्यान या कार्यक्रमामध्ये दीपिकानं तपकिरी रंगाचा स्वेटर आणि पॅन्ट परिधान केला होता. यामध्ये ती खूप देखणी दिसत होती. या कार्यक्रमात अभिनेत्रीचा पहिला चित्रपट 'ओम शांती ओम'मधील गाणं देखील लावण्यात आलं होतं. कार्यक्रमात दीपिकानं तिच्या वाढदिवसापूर्वी बर्थडे केक कापला होता. दरम्यान अलीकडेच दीपिकानं न्यूयॉर्कमध्ये कुटुंबाबरोबरच्या सुट्टीमध्ये 'धुरंधर' चित्रपटाच्या यशाचा आनंदही साजरा केला. तिचे न्यूयॉर्क सुट्टीतील काही व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. दरम्यान दीपिकाबद्दल सांगायचे झाले तर तिने २००७मध्ये 'ओम शांती ओम' चित्रपटातून सिनेसृष्टीत पदार्पण केले होते. यानंतर तिने 'पद्मावत', 'चेन्नई एक्सप्रेस', 'कॉकटेल', 'पिकू', 'लव्ह आज कल' आणि अनेक चित्रपटांमध्ये काम केलं. आता तिचा शाहरुख खान, सुहाना खान आणि अभिषेक बच्चनबरोबर 'किंग' हा चित्रपट येणार आहे. याशिवाय ती तेलुगू 'एए२२एक्सए६' चित्रपटामध्ये दिसणार आहे. या चित्रपटात तिच्याबरोबर अल्लू अर्जुन झळकेल.

# यश स्टारर टॉक्सिक चित्रपटातील मेलिसाच्या भूमिकेतील रुक्मिणी वसंतचा फर्स्ट लूक प्रदर्शित...

मुंबई -दक्षिण सुपरस्टार यश अभिनीत बहुप्रतीक्षित मटॉक्सिकफ हा चित्रपट सध्या चर्चेत आहे. या चित्रपटाचा काही दिवसापूर्वी टीझर प्रदर्शित करण्यात आला होता. हा टीझर अनेकांना आवडला होता. आता अनेकजण हा चित्रपट पाहण्यासाठी खूप उत्साहित आहेत. चित्रपटाची रिलीज तारीख जवळ येत असताना निर्माते प्रमुख अभिनेत्रींचे फर्स्ट लूक एकामागून एक प्रदर्शित करत आहेत. तारा सुतारियाचा फर्स्ट लूक नुकताच प्रदर्शित करण्यात आला. याशिवाय कियारा अडवाणी, हुमा कुरेशी आणि नयनतारा यांचे फर्स्ट लूकही आधीच प्रदर्शित केले गेले आहेत. आता ६ जानेवारी रोजी मटॉक्सिकफच्या निर्मात्यांनी साऊथ अभिनेत्री रुक्मिणी वसंतचा फर्स्ट लूक शेअर केला. या चित्रपटात रुक्मिणी वसंतची भूमिका काय असेल याबद्दल आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.

रुक्मिणी वसंतचा फर्स्ट लूक : गीतू मोहनदास दिग्दर्शित मटॉक्सिकफ या चित्रपटातील रुक्मिणी वसंतचा फर्स्ट लूक खूपच दमदार आहे. फर्स्ट लूकमध्ये, रुक्मिणी वसंतनं हिरव्या रंगाचा एक आकर्षक ड्रेस परिधान केला आहे. याशिवाय तिचे केस मागे बांधलेले आहेत आणि तिची ग्लॅमरस स्टाईल ही मोहित करणार आहे. या चित्रपटातील तिच्या पात्राचे नाव मेलिसा आहे. यापूर्वी, तारा सुतारियाचा फर्स्ट लूक प्रदर्शित झाला होता, ज्यामध्ये अभिनेत्री ऑफ-शोल्डर डार्क ड्रेसमध्ये, हातात बंदूक धरून असल्याची दिसली होती. या लूकमध्ये ती खूपच प्रभावी दिसत होती. मटॉक्सिकफ चित्रपटात तारा रेबेकाची भूमिका साकारणार आहे. आता मटॉक्सिकफ या चित्रपटाच्या कहाणीबद्दल अनेकजण उत्सुक आहेत. हा एक मास अॅक्शन चित्रपट असणार आहे.मटॉक्सिकफ चित्रपटाबद्दल : याशिवाय यापूर्वी चित्रपटातील नयनताराचा डॅशिंग फर्स्ट लूक खूप धमाकेदार होता. नयनताराची भूमिका गंगा नावाच्या मुलीची आहे. तसेच या चित्रपटामध्ये हुमा कुरेशी एलिझाबेथची भूमिका साकारणार आहे. याशिवाय कियारा अडवाणी नादियाची भूमिका करणार आहे. मटॉक्सिकफमधील या चार अभिनेत्रींच्या भूमिका खूपच मनोरंजक, आश्चर्यकारक आणि रहस्यमय आहेत. यश आणि गीतू मोहनदास यांनी मटॉक्सिकफ चित्रपटाचं सहलेखन केलंय. तसेच गीतू मोहनदास यांनी चित्रपटाचे दिग्दर्शन केलं आहे. या चित्रपटाचे निर्माते वेंकट नारायण आणि यश आहेत. हा चित्रपट कन्नड आणि इंग्रजीमध्ये चित्रित करण्यात आला आहे, मात्र हा हिंदी, तेलुगू, तमिळ, मल्याळम आणि इतर अनेक भाषांमध्ये डब केला जाईल.फ्टॉक्सिकफ १९ मार्च २०२६ रोजी उगादी, गुढी पाडवा आणि ईदच्या निमित्तानं प्रदर्शित होणार आहे. तसेच रणवीर सिंगचा बहुप्रतीक्षित चित्रपट, मधुरंधर २फ, देखील त्याच तारखेला प्रदर्शित होईल. मधुरंधर २फ आणि मटॉक्सिकफ यांच्यातील २०२६ मधील आतापर्यंतची सर्वात मोठी टक्कर असण्याची अपेक्षा आहे.

## बिग बॉस जिंकला पण निर्मात्यांनी अजून दिली नाही कार

मुंबई-बिग बॉस १९'चा विजेता ठरलेला अभिनेता गौरव खन्ना सध्या एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आला आहे. नुकत्याच शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये गौरवने स्वत:च खुलासा केला आहे की, बिग बॉस शो जिंकूनही त्याला मिळणारी कार अजूनपर्यंत त्याच्या ताब्यात आलेली नाही.

मअनुपमाफ या लोकप्रिय मालिकेमुळे घराघरात पोहचलेला गौरव खन्ना आज टेलिव्हिजनवरील आघाडीच्या कलाकारांपैकी एक मानला जातो. डेली सोप्ससोबतच त्याने अनेक रिॲलिटी शोमध्ये सहभाग घेतला आहे. मसेलिब्रिटी मास्टरशेफफ जिंकल्यानंतर त्याने सलमान खान होस्ट करत असलेल्या मबिग बॉस १९फची ट्रॉफीही आपल्या नावावर केली. यानंतर गौरवने स्वत:चा यूट्यूब चॅनल सुरू केला असून, त्यावर तो चाहत्यांसोबत वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्यातील अपडेट्स शेअर करत असतो.

अंबानी कुटुंबासाठी खास कार्यक्रमाचं होस्टिंग

गौरवने नुकताच आपल्या यूट्यूब चॅनलवर शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये एका मोठ्या कार्यक्रमाच्या तयारीची झलक दाखवली आहे. हा कार्यक्रम रिलायन्स कुटुंबाकडून दरवर्षी धीरूभाई अंबानी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केला जातो. या कार्यक्रमाचं होस्टिंग यंदा गौरव करणार आहे. व्हिडिओमध्ये गौरव सांगतो की, हा त्याच्यासाठी पूर्णपणे वेगळा अनुभव आहे.

# रवींद्र चव्हाण यांचे विलासराव देशमुखांबाबत वक्तव्य; रितेश देशमुख म्हणाला, दोन्ही हात वर करून सांगतो

मुंबई-महाराष्ट्रात २९ महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रचाराची रणधुमाळी सुरु झाली आहे. लातूर महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजपाच्या वतीने नुकतंच बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं. या बैठकीत भाषण करत असताना रवींद्र चव्हाण यांनी महाराष्ट्राचे दिवंगत माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्याबद्दल केलेल्या एका वक्तव्यामुळे सध्या लातूरमधील राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. विलासराव देशमुख यांचे सुपुत्र अमित देशमुख यांनी या वक्तव्याचा निषेध केला आहे. तर, रितेश देशमुखने सुद्धा यासंदर्भात व्हिडीओ शेअर केला आहे.

''सर्वांनी दोन्ही हात उंच करून घोषणा द्यायची आहे, भारत माता की जय, वंदे मातरम्, वंदे मातरम्, भारतीय जनता पार्टीचा विजय असो, खरंतर आपल्या सर्वांचा उत्साह पाहिला तर लक्षात येतंय की, १०० टक्के विलासरावांच्या आठवणी या शहरातून पुसल्या जातील, यात काही शंका नाही'' असं वक्तव्य रवींद्र चव्हाण यांनी केलं होतं.



यावर तीव्र नाराजी व्यक्त करत अमित देशमुख म्हणतात, ''भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी लातूरमध्ये येऊन आदरणीय विलासराव देशमुख साहेबांच्या संदर्भात जे विधान केलंय, ते अत्यंत दुर्दैवी दुःखदायक आहे, त्यांच्याकडून आणि भारतीय जनता पक्षाकडूनही अशा वक्तव्याची अपेक्षा नव्हती, त्यांच्या या वक्तव्यामुळे आम्हा सर्व लातूरकरांची मने दुखावली आहेत. आम्ही त्या वक्तव्याचा तीव्र शब्दात निषेध नोंदवत आहोत.''

तसेच अभिनेता रितेश देशमुखने याबाबत व्हिडीओ शेअर करत आपली प्रतिक्रिया दिली आहे. ''दोन्ही हात वर करून सांगतो, लोकांसाठी जगलेल्या माणसांची नावे मनावर कोरलेली असतात. लिहिलेलं पुसता येते पण, कोरलेले नाही. जय महाराष्ट्र''

दरम्यान, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी देखील रवींद्र चव्हाण यांच्या वक्तव्यावर संताप व्यक्त केला आहे. ''स्व. विलासराव देशमुख साहेबांच्या आठवणी लातूर जिल्ह्यातून पुसू शकणारा अजून कोणी निर्माण नाही झाला. अनेकजण इच्छा बाळगून आलेत आणि स्वाभिमानी लातूरकरांनी त्यांना त्यांची जागा दाखवून दिलीय. विलासराव देशमुख यांनी लातूर जिल्ह्याला राष्ट्रीय पातळीवर ओळख मिळवून दिली, त्यांनी आपलं संपूर्ण आयुष्य लातूरच्या विकासासाठी समर्पित केलं. आज त्यांच्याबद्दल हे सत्तेचा माज असलेले भाजप नेते लातूरात येऊन बरळून जातात की साहेबांच्या आठवणी पुसल्या गेल्यात. त्यांना काय समजणार विलासराव देशमुख साहेबांचं लातूरशी असलेलं नातं. लातूरच्या कर्तृत्वसंपन्न सुपुत्राचा अपमान लातूरकर कधीही सहन करणार नाही, भाजपवाल्यांनो याद राखा, करारा जवाब मिलेगा!'' असं सपकाळ यांनी त्यांच्या एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे.

# नांदेड येथील ‘हिंद-दी-चादर’ कार्यक्रम ऐतिहासिक करावा

## कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्वांचा समावेश आवश्यक- मान्यवरांचे पत्रकार परिषदेत आवाहन

**नांदेड/प्रतिनिधी :** ‘‘हिंद-दी-चादर’’ श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी सर्व समाजातील नागरिकांनी उपस्थित राहून हा कार्यक्रम ऐतिहासिक करावा, असे आवाहन आज आयोजित पत्रकार परिषदेत मान्यवरांनी केले.

सचखंड पब्लिक स्कूल येथील गुरु ग्रंथ साहिब भवन येथे आयोजित या पत्रकार परिषदेस जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, तख्त सचखंड श्री हजूर साहिब गुरुद्वारा अबचलनगर नांदेडचे मुख्य जथ्थेदार संत बाबा कुलवंत सिंगजी यांच्यासह भाई जोसिंदर सिंगजी, भाई राम सिंगजी, भाई कश्मीर सिंगजी, भाई गुरमीत सिंगजी तसेच गुरुद्वारा लंगर साहिबचे संत बाबा बलविंदर सिंगजी, समिती अध्यक्ष डॉ. विजय सतबीर सिंग, सरजीत सिंग गिल, राज्यस्तरीय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, महंत





सुनिल महाराज, महंत जितेंद्र महाराज, राष्ट्रीय बंजारा परिषदेचे संस्थापक किशनराव राठोड आदी उपस्थित होते.

राज्य शासनाचा अल्पसंख्याक विकास विभाग, राज्यस्तरीय समिती, शीख, सिकलीकर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मीकी, उदासीन व भगत नामदेव (वारकरी संप्रदाय) व इतर सर्व समाज यांच्या संयुक्त विद्यामाने हिंद-दी-चादर कार्यक्रमाचे आयोजन नांदेड शहरातील मोदी मैदान येथे करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी म्हणाले की, महाराष्ट्र शासन व विविध समाज यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या ‘‘हिंद दी चादर‘‘ कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सध्या तयारी वेगाने सुरु आहे. भाविकांनी कुठल्याही प्रकारची अडचण भासणार नाही याची पूर्णत: काळजी घेतली जाईल. कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी विविध २५ समित्यांची स्थापन करण्यात आली असून समित्यांवर सोपविलेल्या कामाप्रमाणे नियुक्त अधिकारी व कर्मचारी दक्षतेने कामे करीत आहेत. भाविकांसाठी जिल्हानिहाय पार्किंगची ठिकाणे निश्चित करण्यात आली असून निवासासाठी शहरातील शाळा, महाविद्यालये व मोकळ्या जागा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. वाहतूक व्यवस्थेचे सुसूत्र नियोजन करण्यात आले असून आवश्यक वाहनांची व्यवस्था देखील करण्यात येत आहे. नांदेड हे रेल्वेमार्गावर असल्याने रेल्वे विभागाच्या सहकार्याने अधिकाधिक भाविकांना रेल्वे सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करण्यात येत आहे. लंगर, निवास, पाणी व वाहतूक व्यवस्थेचा दैनंदिन आढावा घेतला जात असून आरोग्य सेवांसाठी विविध रुग्णालयांमार्फत वैद्यकीय सुविधा पुरविण्यात येणार आहेत. कार्यक्रमस्थळी विविध आरोग्य स्टॉल उभारण्यात येणार आहेत. कार्यक्रमाच्या प्रचार-प्रसिद्धीसाठी विविध शाळांमध्ये स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून येत्या १५ जानेवारीपासून प्रभातफेऱ्या काढण्यात येणार आहेत.

जथेदार साहेब भाई कुलवंत सिंग जी, संत ज्ञानी हरनाम सिंग जी यांनी हिंद-दी-चादर या कार्यक्रमाचे महत्त्व विषद करून शीख व इतर समाजाचे कार्यक्रमाच्या अनुषंगाने असणाऱ्या योगदानाबद्दल माहिती दिली. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र शासन करत असलेल्या महत्त्वपूर्ण सहकार्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.

राज्यस्तरीय समिती समन्वयक रामेश्वर नाईक म्हणाले की, शहिदी समागम केवळ धार्मिक कार्यक्रम नसून तो सर्वधर्म समभाव, मानवता, संविधानिक मूल्ये व सामाजिक ऐक्याचा संदेश देणारा ऐतिहासिक उपक्रम आहे. या शहिदी समागम उपक्रमांची सुरुवात नागपूर येथे यशस्वीरित्या पार पडलेली असून त्याच उपक्रमाचा पुढील महत्त्वाचा टप्पा म्हणून नांदेड येथे दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी दोन दिवसांचा भव्य शहिदी समागम कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विविध राज्यांचे मुख्यमंत्री व मान्यवर उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम ऐतिहासिक करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे. या कार्यक्रमाची मोठया प्रमाणात प्रचार-प्रसिद्धी करून आपल्या नांदेड जिल्ह्याच्या नावलौकिकात भर घालावी.

## दयानंद विज्ञानमध्ये राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाईन क्विझ स्पर्धा

**लातूर/प्रतिनिधी:** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील प्राणिशास्त्र आणि मत्स्यशास्त्र विभागाच्या वतीने राष्ट्रीय पक्षी दिनाच्या निमित्ताने दि.०५ ते ०७ जानेवारी २०२६ या दरम्यान ऑनलाईन क्विझ स्पर्धा यशस्वीरित्या घेण्यात आली व सहभागींना सहभागाचे ई-प्रमाणपत्रही देण्यात आले. महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,विभाग प्रमुख डॉ.रवी सोळुंके,आयक्यूएसी समन्वयक समन्वयक डॉ.जमन अंगुलवार यांच्या मार्गदर्शनानुसार स्पर्धा समन्वयक डॉ.अमोल ठोसर यांनी सदरील स्पर्धा यशस्वीरित्या घेतली.या स्पर्धेच्या आयोजन समितीतील डॉ.आर.व्ही. कीर्तने, डॉ.सुरज कोल्हे ,प्रा.शिलेश गावीत,डॉ.एस.बी. जाधव,प्रा.पी.एस.धरणे व प्रा.एम.एस. आगलावे यांचेही सहकार्य लाभले.

## मकर संक्रांती आणि होळी सणांच्या निमित्ताने रेल्वेकडून कलबुरगि-बंगळूरु कॅन्ट. विशेष गाड्यांच्या सेवा आठवड्याच्या शेवटी अतिरिक्त १६ फेऱ्यांसाठी सुरु ठेवण्यात येणार

**सोलापूर/प्रतिनिधी:** सोलापूर विभागातील कलबुरगि आणि शहाबाद स्थानकांवर थांबा असेल

मकर संक्रांती आणि होळी सणांच्या पार्श्र्वभूमीवर आणि प्रवाशांच्या मागणीनुसार, रेल्वे कलबुरगि आणि बंगळूरु कॅन्ट. दरम्यान आठवड्याच्या शेवटी धावणाऱ्या विशेष गाड्यांच्या सेवा खाली दिलेल्या तपशिलानुसार अतिरिक्त १६ फेऱ्यांसाठी सुरू ठेवणार आहे:

कलबुरगि-बंगळूरु कॅन्ट. साप्ताहिक विशेष गाड्या (१६ फेऱ्या)

- गाडी क्रमांक ०६२०७ बंगळूरु कॅन्ट.-कलबुरगि साप्ताहिक विशेष गाडी, जी २७.१२.२०२५ पर्यंत चालवण्याची घोषणा करण्यात आली होती, ती आता २८.०२.२०२६ पर्यंत दर शनिवारी धावत राहील. (८ फेऱ्या)
- गाडी क्रमांक ०६२०८ कलबुरगि-बंगळूरु कॅन्ट. साप्ताहिक विशेष गाडी, जी २८.१२.२०२५ पर्यंत चालवण्याची घोषणा करण्यात आली होती, ती आता ०१.०३.२०२६ पर्यंत दर रविवारी धावत राहील. (८ फेऱ्या)

वरील गाड्यांच्या रचनेत आणि थांब्यांमध्ये कोणताही बदल होणार नाही. या विशेष गाड्या मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील २ स्थानकांवर थांबतील, ती म्हणजे: कलबुरगि आणि शहाबाद.

आरक्षण आणि बुकिंग:

विशेष गाड्यांसाठी विशेष शुल्कासह आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या वेबसाइटवर उपलब्ध होईल.

अनारक्षित डब्यांसाठी बुकिंग स्थानकांवरील बुकिंग काउंटरवर आणि यूटीएस (UTS) पद्वारे देखील करता येईल. प्रवाशांना विनंती आहे की गैरसोय टाळण्यासाठी वैध तिकिटासह प्रवास करावा.

या विशेष गाड्यांच्या थांब्यांवरील सविस्तर वेळापत्रकासाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा RailOne किंवा NTES प डाउनलोड करा.

# भाजपा हा विकासाचा बुलंद गड, काँग्रेस विनाशाचे प्रतीक; त्यासाठी लातूरकरांनी भाजपाला प्रचंड मतांनी निवडून द्यावे : सचिन साठे

**लातूर/प्रतिनिधी:** देशातील सामान्य माणसाचे जीवन सुखकर करण्यासाठी, महापुरुषांचा सन्मान राखत विकासाचा झंझावात उभा करणारे भारतीय जनता पार्टीचे सरकारच एकमेव सक्षम सरकार आहे, असा ठाम दावा आण्णाभाऊंचे वारस सचिन साठे यांनी केला. लातूर महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक २ मधील उमेदवारांच्या प्रचारसभेत ते बोलत होते.

साठे म्हणाले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा थेट रशियासारख्या देशात उभारून भाजप सरकारने कष्टकरी समाजाचा गौरव केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाचा सन्मान राखत त्यांच्या लंडनमधील घराचे जतन करण्यासाठी ऐतिहासिक निर्णय भाजप सरकारने घेतला. मात्र तब्बल ७० वर्षे सत्तेत राहिलेल्या काँग्रेसला ना गरीब दिसला, ना शेतकरी, ना कामगार; महापुरुषांच्या विचारांशी त्यांचे कधीही नाते राहिले नाही, अशी घणाघाती टीका त्यांनी केली.

आज सत्ता गमावल्याच्या नैराश्यातून काँग्रेसकडून ‘संविधान धोक्यात आहे’ अशा अफवा पसरवून जनतेची दिशाभूल केली जात आहे. पण देशातील जनता सुज्ञ आहे. संविधानाचा खरा सन्मान करणारा, देश मजबूत करणारा आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी काम करणारा पक्ष म्हणजे भारतीय जनता पार्टी आहे, हे जनतेने ओळखले आहे, असे ते म्हणाले.

लातूर शहराचा सर्वांगीण विकास, सुरक्षित भविष्य आणि मजबूत प्रशासनासाठी भाजपच्या सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमतांनी निवडून देण्याचे आवाहन सचिन साठे यांनी केले.

यावेळी प्रभाग क्रमांक २ मधील उमेदवार रवी सुडे, अमर पटेल, पुष्पा भडीकर व निर्मलाताई कांबळे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, भाजप नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, भाजप शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, माजी सभापती संजय दोरवे, प्रा. पंडित सूर्यवंशी यांच्यासह अनेक मान्यवर व कार्यकर्ते मोठ्या संख्येने



उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनीही काँग्रेसच्या अपयशावर जोरदार प्रहार करत भाजपच्या विकासकामांची माहिती दिली.

# दडपशाही, हुकूमशाही आमची संस्कृती नाही माजी आमदार धिरज देशमुख यांचे प्रतिपादन

**लातूर/प्रतिनिधी:** आम्ही लोकशाही मार्गान चालणारी माणस असून आम्हाला दडपशाही हुकूमशाही टक्केवारी कधी जमलीच नाही ती आमची संस्कृती ही नाही लाकशाही मार्गाने तुमच्या हक्कासाठी लढण्यासाठी आमच्या हाती महापालिका निवडणूकीत काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या सर्वच्या सर्व उमदवारांना विजयी करून मतदान स्वरुपी ताकत द्या, असे आवाहन लातूर ग्रामीणचे माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवृत्ती बँकेचे चेअरमन धिरज विलासराव देशमुख यांनी आयोजित प्रचार सभेत केले.

लातूर महानगरपालिकेच्या होऊ घातलेल्या प्रभाग क्र. ६ व १६ च्या निवडणकीच्या आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते. या प्रचार सभेसाठी ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष प्रा. यशपाल भिंगे, माजी नगरसेवक फकिरा जोगदंड, गोविंद सुरवसे, केशरताई महापुरे, माजी उपनगराध्यक्षा ख्वॉजाबानू बुऱ्हाण, गोविंद ठाकूर, प्रा. शिवाजी शिंदे, माधव गंभीरे, बालाप्रसाद बिदादा, श्रीराम गायकवाड यांचासह प्रभाग क्र. ६ तील काँग्रेसचे उमेदवार सुनिता चाळक, गिरीश व्याळे, मंजुला अग्रवाल, दिनेश गोजमगुंडे, प्रभाग क्र. १६ तील उमेदवार अकबर माडजे, काशिनाथ जोंधळे, रेखा नावंदर, सरोजा अभंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना माजी आमदार धिरज देशमुख म्हणाले की, लातूरची देशभरात सुसंस्कृत शहर अशी ओळख आहे. लातूरकरांनी आत्ता पर्यंत कोणाला ही हिणवले नाही, आपशब्द काढलेला नाही कोणाची निंदा नालस्ती केली नाही. पण





आज घडीला महाराष्ट्रात काय चालू आहे. सत्तेसाठी एकत्र आलेले महापालिकेच्या निवडणूकीच्या

निमित्ताने उगी उगी भांडणाचे सोंग करून नागरिकांची दिशाभुल करीत आहेत. आज केंद्रात राज्यात सत्ता भाजपाच्या हातात आहे. राज्यातील जनता विकास मागत असून शेतकरी आपल्या शेतमालाला हमी भाव मागतो आहे. बेरोजगार तरुण रोजगार मागतो आहे. असे असताना मात्र त्यांना काहीच मिळत नाही. उलट सत्तेत बसलेले तिजोरीच्या चावीवरुन भांडत आहेत. काँगेस पक्षाच्या पाचवीला संर्घष पुजलेला असून आम्ही मागे न हटता सर्वसामान्यासाठी लढणार आहोत.

सत्ताधाऱ्यांनी प्रशासक नेमूण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका लांबणीवर टाकल्या या निवडणूका ही ते घेणार नव्हते, आपल्याच पक्षातील निष्ठावंतांना डावलून काँग्रेस पक्षातील काही लोंकाना निवडणूकीत उतरवून भाजप नागरिकांची दिशाभूल करीत आहे. लातूर शहर व जिल्ह्याला नेहमीच पुरोगामी विचाराच्या लोकांनी न्याय दिला असून लातूरच्या मतदारांनी लोकसभेला डॉ. शिवाजी काळगे यांना तर विधानसभेला आमदार अमित विलाराव देशमुख यांना

विजयी केले आता महानगरपालिकेच्या तिसऱ्या निवडणूकीत काँगेसला विजयी करून हॅट्रीक साधावी, असे आवाहन ही केले.

या प्रभागात माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनात जवळपास १० कोटीची विकास कामे करण्यात आली असून भाजपवाले मात्र फित कापण्यात मशगुल आहेत. तेव्हा अशांचा भुलथापांना बळी न पडता लातूरच्या विकासासाठी नागरिकांनी काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या सर्वच्या सर्व उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन करून या सभेतून साहेबांची आठवण पुसून काढण्याची भाषा करणाऱ्या व भाजपाच्या इतर नेत्यांना मकर संक्राती जवळ आली आहे तीळगुळ घ्या अण लातूरात येऊन गोड-गोड बोला असा सल्ला ही दिला.

लोकनेते विलासराव देशमुख लातूकरांच्या मनामनात : प्रा. यशपाल भिंगे

यावेळी कॉग्रेस पक्षाचे ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष प्रा. यशपाल भिंगे यांनी बोलताना माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख हे लातूरकरांच्या मनामनात असून लातूरकर १६ तारखेला भाजपाच्या नेत्यांचे अश्रू पुसणार आहेत. पळवापळवीत तरबेज असलेल्या भाजपाने प्रशासक राज आणले प्रशासक राजच्या काळात विकास खुंटला आहे. आंतराष्ट्रीय पातळीवर देशाची बदनामी सुरू असून या भाजपा कारणीभूत आहे. आता पर्यंत राज्यात शेतकरी आत्महत्या पाहिल्या होत्या परंतु सत्ताधा-यांच्या कार्यकाळात शासकीय ठेकेदारांच्या आत्महत्या होत आहेत. सध्या सुरू असलेली लढाई ही देशाच्या हिताची आपण के णाच्या बाजून आहोत ही सांगणारी लढाई असून देश हितासाठी लातूरचे नागरिक नक्कीच काँगेस व वंचित बहुजन आघाडीच्या उमदवारांच्या पाठीशी खंबीर पणे उभे राहतील असा विश्वास ही भिंगे यांनी यावेळी व्यक्त केला.

या वेळी मतदार नागरिक उपसिथत होते.

## शालेय विद्यार्थिनीच्या मृत्यू प्रकरणी स्वतंत्र चौकशीची मागणी; एनएसयूआयचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**लातूर/प्रतिनिधी:** जवाहरलाल नवोदय विद्यालय, लातूर येथे इयत्ता सातवीत शिक्षण घेत असलेल्या कु. अनुजा पाटोळे या विद्यार्थिनीच्या मृत्यू प्रकरणाची आत्महत्या म्हणून नोंद करण्यात आल्याने संशय व्यक्त होत असून, या घटनेची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी एन.एस.यू.आय. (विद्यार्थी काँग्रेस) लातूरच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकारी व शिक्षण अधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, उपलब्ध माहिती व परिस्थिती लक्षात घेता हा मृत्यू आत्महत्येचा नसून, शाळेतील मानसिक ताण, शैक्षणिक दबाव, समुपदेशनाचा अभाव तसेच प्रशासनाची दुर्लक्षाची भूमिका कारणीभूत असण्याची शक्यता आहे. इतक्या लहान वयातील विद्यार्थिनीचा मृत्यू ही अत्यंत गंभीर बाब असून, केवळ आत्महत्येचा ठपका लावून प्रकरण बंद करणे अन्यायकारक ठरेल, असेही नमूद करण्यात आले आहे.

एनएसयूआयने या प्रकरणाची सखोल व पारदर्शक चौकशी करणे, संबंधित शाळा प्रशासन, शिक्षक व अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे, दोषी आढळल्यास कठोर कारवाई करणे, मृत विद्यार्थिनीच्या कुटुंबाला न्याय व योग्य मदत देणे तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी नवोदय विद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी ठोस उपाययोजना राबवाव्यात, अशा मागण्या केल्या आहेत.

यावेळी जिल्हाध्यक्ष रोहित बिराजदार, महेश सोळंके, उबेद शेख, प्रथमेश राठोड यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# हिंद की चादर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली विविध संघटनांसोबत आढावा बैठक



**नांदेड/प्रतिनिधी :** जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांच्या अध्यक्षतेखाली ‘‘हिंद की चादर’’ कार्यक्रमाच्या प्रचार-प्रसिद्धी तसेच इतर अनुषंगिक बाबींविषयी हॉटेल असोसिएशन, विविध व्यापारी संघटना व स्वयंसेवी संस्था () यांच्या सहभागाने आज जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेण्यात आली.

या बैठकीत कार्यक्रमाच्या अनुषंगाने करावयाच्या कामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी लागणारे आवश्यक नियोजन, समन्वय व प्रभावी अंमलबजावणीबाबत उपस्थितांना मार्गदर्शन व सूचना देण्यात आल्या. ‘‘हिंद की चादर’’ कार्यक्रम व्यापक स्तरावर पोहोचावा यासाठी सर्व संबंधित घटकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# १२ जानेवारी रोजी धाराशिव येथे एकदिवसीय कार्यशाळा: एमएसएमई, निर्यात व उद्योजकांसाठी एकाच व्यासपीठावर मार्गदर्शन

धाराशिव, (जिमाका) 'इग्नाईट कन्व्हेंशन-२०२६' अंतर्गत एकदिवसीय कार्यशाळा सोमवारी, १२ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात येत आहे. राज्याच्या आर्थिक विकासात मोलाचे योगदान देणाऱ्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) क्षेत्रावर अधिक भर देऊन त्यांची कार्यक्षमता व उत्पादकता वाढविणे, राज्यात उद्योजकीय वातावरण अधिक व्यापक करून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात निर्माण करणे, एक जिल्हा एक उत्पादन उपक्रम तसेच निर्यातवृद्धीस चालना देण्याच्या उद्देशाने राज्य व केंद्र शासनाच्या विविध विभागांमार्फत अनेक योजना व उपक्रम राबविण्यात येत आहेत.

या सर्व योजनांची माहिती उद्योजकांना एकाच व्यासपीठावर उपलब्ध व्हावी, या उद्देशाने संबंधित सर्व विभागांच्या सहकार्याने 'इग्नाईट कन्व्हेंशन-२०२६' अंतर्गत ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली ही कार्यशाळा सोमवारी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सेंट्रल बिल्डिंगजवळ, धाराशिव येथे होणार आहे.

या कार्यशाळेसाठी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटक, निर्यातदार, निर्यातक्षम उद्योजक, नवउद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, औद्योगिक समूह, औद्योगिक वसाहती, शेतकरी सहकारी संस्था व उत्पादक, प्रक्रिया उद्योग केंद्रे, तसेच राज्य शासन व संबंधित उपक्रमांचे अधिकारी, जिल्हा निर्यात प्रचालन समितीचे सदस्य, निर्यातविषयक कामकाज करणारे घटक, संशोधक व बँक प्रतिनिधी यांना आमंत्रित करण्यात आले आहे.

कार्यशाळेत पुणे येथील डीजीएफटीचे महासंचालक, अपेडा पुणे, एमएसएमईचे सहायक संचालक, मैत्री कक्षाचे अधिकारी, इंडियन पोस्टचे अधिकारी, अधीक्षकीय कृषी अधिकारी, एसबीआयचे निर्यात वित्तपुरवठा व्यवस्थापक आदी तज्ज्ञांकडून निर्यात, उद्योगविकास व शासकीय योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

# अधिकारमित्र पदासाठी अर्जास १७ जानेवारीपर्यंत मुदतवाढ: निस्वार्थ समाजसेवेची इच्छुकांसाठी सुवर्णसंधी - जिल्हा विधी सेवा प्राधिकरण

धाराशिव, (जिमाका)- उस्मानाबाद जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्ह्यातील सर्व तालुका विधी सेवा समित्यांमार्फत 'अधिकारमित्र' पदाकरिता काम करण्यास इच्छुक असलेल्या अर्जदारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. यासाठी पूर्वीची अंतिम तारीख दि.६ जानेवारी २०२६ होती. आता सदर पदासाठी अर्ज सादर करण्यास दि.१७ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

धाराशिव तालुका कार्यक्षेत्रातील अर्जदारांनी आपले अर्ज जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, उस्मानाबाद येथे सादर करावेत. तर उमरगा, भूम, परंडा, तुळजापूर, कळंब, वाशी व लोहारा या तालुका कार्यक्षेत्रातील अर्जदारांनी आपले अर्ज संबंधित तालुका विधी सेवा समितीच्या न्यायालय परिसरातील कार्यालयात दिनांक १७ जानेवारी २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी सादर करावेत. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

अर्ज करण्यासंबंधी पात्रता, अटी, नियम व इतर तपशीलांची जाहीर सूचना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, उस्मानाबाद तसेच सर्व तालुका विधी सेवा समिती, पंचायत समिती, तहसील कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत.

ज्यांना निस्वार्थ समाजसेवा तसेच शासकीय योजनांची जनजागृती करण्याची इच्छा आहे व जे विहित पात्रता धारण करतात, अशांसाठी ही एक सुवर्णसंधी आहे. निवड झालेल्या अधिकारमित्रांना कार्यालयीन कार्यक्रम व उपक्रमांसाठी सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत किंवा क्षेत्रीय स्तरावर कार्यक्रमाच्या स्वरूपानुसार कर्तव्य पार पाडावे लागणार आहे. यासाठी प्रतिदिन ७५० रूपये मानधन देण्यात येणार आहे.

तरी या संधीचा लाभ सर्व संबंधितांनी घ्यावा व १७ जानेवारी २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, उस्मानाबाद व संबंधित तालुका विधी सेवा समिती येथे अर्ज सादर करावेत, असे आवाहन श्रीमती. अभिश्री देव, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्षा, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि श्रीमती भाग्यश्री पाटील, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), उस्मानाबाद यांनी केले आहे.

# पहिल्या 'खेलो इंडिया ट्रायबल गेम्स' साठी १३ जानेवारीला राज्यस्तरीय निवड चाचणी: अनुसूचित जमातीतील खेळाडूंना सहभागी होण्याचे आवाहन

धाराशिव, दि. ९ जानेवारी (जिमाका) पहिल्या 'खेलो इंडिया ट्रायबल गेम्स-२०२५-२६' चे आयोजन छत्तीसगढ राज्यामध्ये करण्यात येणार आहे. या स्पर्धेमध्ये फुटबॉल, हॉकी, आर्चरी, ॲथलेटिक्स, जलतरण, वेटलिफ्टींग व कुस्ती या खेळांचा समावेश असून ही स्पर्धा खुल्या वयोगटात आयोजित करण्यात येणार आहे.

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार वरील खेळप्रकारांच्या राज्य व राष्ट्रीय स्तरावरील निवड चाचण्यांचे आयोजन करण्यात येणार आहे. राज्यस्तरीय निवड चाचणीतून राष्ट्रीय निवड चाचणीसाठी खेळाडू अथवा संघाची निवड करण्यात येईल. त्यानंतर राष्ट्रीय निवड चाचणी व स्पर्धेमधून 'खेलो इंडिया ट्रायबल गेम्स-२०२५-२६' साठी खेळाडू व संघ पात्र ठरणार आहेत.

या राज्यस्तरीय निवड चाचणी अंतर्गत आर्चरी, कुस्ती व वेटलिफ्टींग हे खेळ जिल्हा क्रीडा संकुल, तपोवन गेट, अमरावती येथे; हॉकी - यश केडमी, सोनाई, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर येथे; ॲथलेटिक्स - पोलिस ग्राउंड, पालघर येथे; जलतरण - श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथे; तर फुटबॉल - विभागीय क्रीडा संकुल, मानकापूर कोराडी, नागपूर येथे आयोजित करण्यात येणार आहेत. या सर्व खेळांच्या राज्यस्तरीय निवड चाचण्या दिनांक १३ जानेवारी २०२६ रोजी होतील व खेळाडूंनी दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत उपस्थित राहणे आवश्यक आहे.

या निवड चाचणीसाठी उपस्थित राहणाऱ्या खेळाडूंनी अनुसूचित जमाती (Scheduled Tribe) प्रवर्गातील जात प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्यातील अधिवास प्रमाणपत्र (डोमिसाईल), मूळ आधार कार्ड तसेच संबंधित खेळासाठी आवश्यक साहित्य व संरक्षक साहित्य सोबत आणणे अनिवार्य आहे. वैयक्तिक खेळप्रकारात आर्चरीमध्ये प्रत्येक बाबीसाठी गुणानुक्रमे प्रथम आलेले तीन खेळाडू, तसेच ॲथलेटिक्स, जलतरण, कुस्ती व वेटलिफ्टींग या खेळप्रकारांत गुणानुक्रमे प्रथम आलेले दोन खेळाडू राष्ट्रीय निवड चाचणीसाठी पात्र ठरणार आहेत.

सर्व खेळाडूंनी या निवड चाचणीत स्वतःच्या खर्चाने व स्वतःच्या जोखीम व जबाबदारीवर सहभागी व्हावे. मात्र खेळाडूंची निवास व भोजन व्यवस्था कार्यालयामार्फत करण्यात येईल. सहभागी खेळाडूंना कोणत्याही प्रकारचे प्रमाणपत्र दिले जाणार नाही.

राज्यस्तरीय निवड चाचणीत सहभागी होणाऱ्या खुल्या वयोगटातील खेळाडूंनी १२ जानेवारी २०२६ पूर्वी संपर्क प्रमुखांशी संपर्क साधून आपल्या नावांची नोंद करणे अनिवार्य आहे. आर्चरी, कुस्ती व वेटलिफ्टींगसाठी श्री. स्वप्निल चांदेकर (९४०४३७९६७७), हॉकीसाठी श्री. विशाल गर्जे (८३६९५३९०७७), ॲथलेटिक्ससाठी श्री. अमृत घाडगे (९८७००४८६४९), जलतरणसाठी श्री. बालाजी केंद्रे (९५०३५४८९८८) व फुटबॉलसाठी श्री. अनिल बोरावार (९४२२१५९०८३) यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

जिल्ह्यातील अधिकाधिक अनुसूचित जमातीतील खेळाडूंनी या निवड चाचणीत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.

# अवैध मद्य विरोधी कारवाई


लोहारा ठाणे: आरोपी नामे-अतिश पांडुरंग दुनगे, वय ३१ वर्षे, रा. तोरंबा ता. लोहारा जि. धाराशिव हे दि.०८.०१.२०२६ रोजी १४.२० वा. सु. तोरंबा येथे त्याचे राहते घराचे समोर अंदाजे ३,२०० किंमतीची ३२ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये लोहारा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

# काम बोलत, नेतृत्व घडते, अर्चनाताई पाटील यांच्या धडाडीमुळे जिल्हाभरात विश्वासाचा नवा अध्याय



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)-व्यवस्थेचा धुरा आपल्या समर्थ नेतृत्वाखाली उचललेला आहे. नियोजन, अंमलबजावणी आणि लोक अशी थेट संवाद या तिन्ही सूत्रावर त्यांची निवडणूक यंत्रणा ठामपणे उभा आहे. विकासाला वेग देणारा वीस कोटीचा पॅकेज निवडणुकीच्या तोंडावर ही केवळ आश्वासनावर न थांबता अर्चनाताईंनी प्रत्यक्ष कामातून विश्वास निर्माण केला आहे. तेर परिसरासाठी विशेष २० कोटीचे विकास पॅकेज उपलब्ध करून देत दवाखाने स्मशानभूमी, गाववालगतचे रस्ते तसेच सार्वजनिक सुविधाच्या कामाला गती दिली. गोरोबाकाका मंदिर घाट आतील वावरी कालेश्वर मंदिर, माळी गल्लीतील रस्ते, दलित वस्तीतील समशानभूमी, शिखर गल्लीतील मंदिराचे शिखर व पूर्ण मंदिर जीर्णोधार शनी मंदिराचा पूर्ण जीर्णोद्धार या सर्व कामातून विकासाचे स्पष्ट छाप उमटली. पावसाळ्यात तेर मधील रस्ते पाण्याखाली गेले तेव्हा अर्चनाताई कार्यालयात बसून सूचना देत नव्हत्या त्या तीन-तीन -चार तास जेसीबी समोर उभा राहून नाले मोकळे करून पाणी व गाळ काढणे आणि वाहतूक सुरळीत करणे हे काम प्रत्यक्ष मैदानात उतरून करत होत्या, हीच त्यांची समाजसेवेची खरी ओळख आहे. प्रचार न करता जिंकणारे नेतृत्व म्हणजे अर्चनाताई पाटील ह्या तेर गटातून जिल्हा परिषदेसाठी अर्चनाताई पाटील उभ्या राहिल्यास प्रचार न करता देखील त्या निवडून येतील. याबाबत जनतेत ठाम विश्वास आहे, कारण त्या केवळ आश्वासने देत नाहीत त्या जमिनीवर राहून काम करतात. घराघराशी नाते जपतात. प्रत्येकाला आपले मानतात त्यांच्या बाबत अस्था आहे म्हणूनच संपूर्ण जिल्ह्यात त्यांना एकच कुटुंब अशी भावना लाभली आहे. २४ तास जनतेसाठी तत्पर असतात. लोकांचा प्रश्न ऐकणे उत्तर देणे आणि काम पूर्ण होईपर्यंत पाठपुरावा करणे ही अर्चनाताईची कार्यपद्धती त्या कधी स्वतःची वाहवा करून घेत नाहीत. त्यांचे कामच त्यांच्या वतीने बोलते भरघोश यशाची खात्री! अर्चनाताई पाटील यांच्या नेतृत्वात विकास विश्वास आणि संवेदनाशीलता याचा संगम दिसतो. यामुळे येणाऱ्या निवडणुकीत भरघोश यश निश्चित असल्याबाबत कोणतेही दुमत नाही. जिल्ह्याच्या विकासाची गती आणि जनतेच्या विश्वास हेच त्यांच्या यशाची खरे गमक आहे म्हणूनच विरोधक तोंडाने बोलतात आणि यांचे फक्त काम बोलते.

# मुरूम पालिकेच्या उपनगराध्यक्षपदी रमेश चव्हाण यांची निवड



मुरूम (सुधीर पंचगल्ले) मुरूम पालिकेची पहिली विशेष सर्वसाधारण सभा शुक्रवारी (ता. ९) रोजी पालिकेच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. यावेळी उपनगराध्यक्षपदी रमेश चव्हाण यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मुरूम पालिकेत भारतीय जनता पक्षाने बहुमत प्राप्त केले असून नगराध्यक्षपदी बापुराव पाटील हे विजयी झाले आहेत. उपनगराध्यक्ष निवडीसाठी शुक्रवारी (ता. ९) रोजी नवनिर्वाचित नगराध्यक्ष बापूराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पहिल्या सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत पालिकेच्या उपनग लीशाशसारळश्र. लो राध्यक्ष यांची निवड करण्यात आली. उपनगराध्यक्ष पदासाठी रमेश चव्हाण यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने पीठासीन अधिकारी तथा पालिकेचे मुख्याधिकारी सचिन भुजबळ यांनी रमेश चव्हाण यांची उपाध्यक्ष पदासाठी बिनविरोध निवड जाहीर केली.

यावेळी स्वीकृत नगरसेवकपदी सूर्यकांत जाधव व श्रीराम कुलकर्णी यांची निवड करण्यात आली. या निवडीनंतर नवनिर्वाचित नगराध्यक्ष बापूराव पाटील, उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण यांचा भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, युवा नेते मल्हार पाटील, नितीन काळे यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी युवानेते शरण पाटील, माजी सभापती मदन पाटील, उमरगा जनता बँकेचे संचालक रफिक तांबोळी, योगेश राठोड, दत्ता चटगे, गटनेते गणेश अंबर, नगरसेवक गौस शेख, रुपचंद गायकवाड आदींसह नगरसेवक, भाजपचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षक व शिक्षणविरोधी धोरणा विरोधात देशव्यापी आंदोलन

धाराशिव(प्रतिनिधी)-केंद्र व राज्य सरकारच्या शिक्षक व शिक्षणविरोधी धोरणांविरोधात आवाज उठवण्यासाठी देशातील सात प्रमुख शिक्षक संघटनांनी एकत्र येत अखिल भारतीय शिक्षक संघटना संयुक्त कृती समिती (AIJACTO)ची स्थापना केली आहे. शिक्षण क्षेत्रातील ज्वलंत प्रश्नांवर देशव्यापी आंदोलन छेडण्यात येणार असून, येत्या ५ फेब्रुवारी रोजी संसद भवनावर भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी दिली.

शिक्षण व्यवस्था गंभीर संकटात असून सरकारकडून या क्षेत्राकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. AIJACTOच्या वतीने ठढए कायद्यापूर्वी नियुक्त शिक्षकांना TET मधून सूट, जुनी पेन्शन योजना (OPS) पुनर्स्थापित करणे, छएझ २०२० मधील शिक्षणविरोधी तरतुदी मागे घेणे, शाळांचे विलीनीकरण थांबवणे व रिक्त पदे तात्काळ भरणे, शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा भार कमी करणे, कराराधीन कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण, समान कामासाठी समान वेतन आणि ८व्या केंद्रीय वेतन आयोगाची वेळेत अंमलबजावणी या प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या आहेत.

५ फेब्रुवारीच्या संसद मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक पी. एस. घाडगे, व्ही. जी. पवार, अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम, कोषाध्यक्ष ए. बी. औताडे, उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, केंद्र कार्यकारिणी सदस्य एफ. जी. जमादार, सुशीलकुमार तीर्थकर, जिल्हाध्यक्ष जयपाल शेरखाने, जिल्हा कार्याध्यक्ष दयानंद भोसले, जिल्हा कोषाध्यक्ष डी. एम. बनसोडे, जिल्हा सहसचिव गीते, धाराशिव शहराध्यक्ष व्यंकटेश पाटील व धाराशिव तालुकाध्यक्ष एस. के. दराडे यांनी केले आहे. अशी माहिती जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अण्णासाहेब कुरुलकर यांनी दिली.

# गंभीर जखमी होवून मयत:गुन्हा दाखल

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत मयत नामे-अशोक काशिनाथ वनवे, वय ५३ वर्षे, रा. मलकापूर ता. कळंब जि. धाराशिव हे दि.२४.१२.२०२५ रोजी पांडुरंग वणवे यांच्या घरासमोर मलकापूर येथे पायी जात होते.

दरम्यान स्कॉर्पिओ गाडीचा चालकाने त्याचे ताब्यातील स्कॉर्पिओ गाडी ही चालवून अशोक वणवे यांना धडक दिली. या अपघातात अशोक वनवे हे गंभीर जखमी होवून मयत झाले. नमुद स्कॉर्पिओ चालक हा अपघाताची खबर न देता निघून गेला. फिर्यादी नामे-किरण अशोक वनवे, रा. मलकापूर ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.०८.०१.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

# मोटारसायल चोरली

भुम (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी रोहन सुभाष मारकड, वय २४ वर्षे, रा.भवानवाडी ता. भुम जि. धाराशिव यांची अंदाजे ४०,००० किंमतीची मोटरसायकल ही दि. ०४.०१.२०२६ रोजी रोहन मारकड यांचे राहते घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-रोहन मारकड यांनी दि.०८.०१.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या, लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar, Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade, edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers, Mitra Nagar, Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649